१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, मंगळवार ७ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-३३, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 33 Marathi - Daily - Mumbai, 7 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

बारामती कोणाला देणार साथ?

navakal.in

@navakal.news | Navakal Digital Network | @_NDN_Offical | @NavakalNews

दु:ख तळघरात कोंडून बाहेर पडले आहे! साथ द्या

बारामतीत सुनेत्रा पवार भावूक! काँग्रेसनेही अर्ज भरला

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी अजित पवार राष्ट्रवादीकडून आपला अर्ज दाखल केला. अर्ज भरण्यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसच्या मेळाव्यात आपल्या भावना व्यक्त करताना त्या भावूक झाल्या. आपल्या भाषणात त्या म्हणाल्या की, बारामती हा अजित पवारांचा श्वास होता. त्यामुळे त्यांचा अखेरचा श्वासही बारामतीच्या मातीतच विसावला. बारामतीतील प्रत्येक झाडात, फुलात, पानात, रस्त्यात, शाळा, इमारतीत त्यांचा स्पर्श आहे. आज या सर्व गोष्टी त्यांच्या आठवणीने रडत आहेत. तर मी स्वत: माझे दु:ख तळघरात कोंडून अत्यंत धीराने आपल्या सर्वांसाठी बाहेर पडले आहे. जशी दादांना साथ दिलीत, त्यापेक्षाही काकणभर अधिक साथ मला द्या.

अर्ज भरताना सुनेत्रा पवार

काँग्रेस उमेदवार मोरे अर्ज भरताना

■ बारामती

सुनेत्रा पवार यांच्या विरोधात काँग्रेस उमेदवार ॲड. आकाश मोरे यांनी अर्ज भरल्याने बारामती पोटनिवडणूक बिनविरोध होणार नाही, असे चित्र आहे. मात्र अजून अर्ज माघारी घेण्याची मुदत असल्याने येत्या काही दिवसांत घडामोडी कोणत्या घडतात याकडे लक्ष आहे. विशेष म्हणजे, सुनेत्रा पवार यांचा अर्ज भरण्याआधी आज बारामतीत झालेल्या राष्ट्रवादीच्या मेळाव्याच्या व्यासपीठावर लावलेल्या पोस्टरवर पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे फोटो होते. शिवाय खासदार शरद पवार यांचाही फोटो झळकत होता. नंतर दिल्लीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत शरद पवार यांनी नाराजी व्यक्त करत आपला फोटो वापरणे चुकीचे असल्याचे म्हटले. ते म्हणाले की, » पान २ वर

तटकरे-पटेल घातकी! बारामतीत बॅनरची चर्चा

सुनेत्रा पवार अर्ज भरत असतानाच बारामती शहरातील प्रशासकीय भवन परिसरात लावण्यात आलेल्या एका बॅनरने सर्वांचे लक्ष वेधले. या बॅनरवर, अजितदादांचे फक्त नावच पुरेसे आहे, घातकी तटकरे-पटेलची गरज नाही - समस्त दादा प्रेमी, असे लिहिले होते. हा बॅनर कुणी लावला होता, हे कळले नाही. परंतु चर्चा सुरू झाल्यावर तो लगेच उतरवण्यात आला. या बॅनरमधील घातकी या शब्दप्रयोगामुळे बारामतीत तीव्र प्रतिक्रिया उमटल्या असून, अजित पवार समर्थकांमध्ये नाराजी असल्याचे संकेत मिळत आहेत.

थोडक्यात...

जमीन गैरव्यवहार प्रकरणी अमेडियाची सुनावणी लांबणीवर

पुणे - पुणे शहरातील गाजत असलेल्या जमीन गैरव्यवहार प्रकरणात अमेडिया कंपनीची मुद्रांक शुल्काशी संबंधित सुनावणी लांबणीवर पडली आहे. मुद्रांक शुल्क विभागाचे महानिरीक्षक रवींद्र बिनवडे हे सध्या निवडणूक ड्युटीवर असल्यामुळे आजची ही सुनावणी रद्द झाली. पार्थ पवार यांच्या 'अमेडिया' या कंपनीवर मुंढवा येथील १८०० कोटी रुपयांची सरकारी/गायरान जमीन केवळ ३०० कोटी रुपयांना खरेदी केल्याचा आरोप आहे. मुख्य सचिवांच्या अहवालात, अमेडिया कंपनी आणि शीतल तेजवानी यांनी मिळून शासनाची फसवणूक केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

काँग्रेस पाकिस्तानच्या तालावर नाचतो! मोदींचा हल्लाबोल

बारपेटा - आसामच्या बारपेटा जिल्ह्यातील भवानीपूर-सरभोग येथे निवडणूक प्रचारसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज काँग्रेसवर जोरदार हल्ला चढवला. काँग्रेस पक्ष नेहमीच शेजारील पाकिस्तानच्या तालावर नाचत आहे. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करत आहे. आमच्या सरकारने पाकिस्तानातील दहशतवादी तळांविरुद्ध 'ऑपरेशन सिंदूर' सारखी धाडसी पावले उचलली, मात्र दुसरीकडे काँग्रेस पक्ष राष्ट्रीय हिताकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप मोदी यांनी केला. मोदी म्हणाले की, काँग्रेसने नेहमीच अल्पकालीन उपायांवर लक्ष केंद्रित केले आहे, जेणेकरून त्यांना भ्रष्टाचार करता येईल. याउलट आमचे सरकार देशाच्या दीर्घकालीन विकासासाठी काम करत आहे. राज्यातील शांतता आणि स्थिरतेमुळे भाजपाच्या राजवटीत विकासाला चालना मिळाली आहे.

खरात विरुद्ध ईडीकडून मनी लॉंड्रिंगप्रकरणी गुन्हा

नाशिक - राज्यभरात गाजत असलेल्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मनी लॉंड्रिंगप्रकरणी आज पहिला गुन्हा दाखल करून तपासाला अधिकृतपणे सुरुवात केली. त्यामुळे खरात यांच्या अडचणींमध्ये मोठी वाढ होणार आहे. याशिवाय खरातची फरार पत्नी कल्पनाला शोधण्यासाठी नाशिक, पुणे, अहिल्यानगरला विशेष पथक रवाना झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नाशिक दौऱ्यावेळी या प्रकरणात ईडीमार्फत चौकशी होणार असल्याचे संकेत दिले होते. त्यानुसार ईडीने नाशिक पोलिसांकडून या प्रकरणाशी संबंधित सर्व कागदपत्रे मागवून तपासाला सुरुवात केली.

रत्नागिरीत ग्रामस्थांचे लक्ष्मी ऑर्गेनिकला पत्र

रत्नागिरी - सुपीक जमिनीवर प्रस्तावित पीफास केमिकल उत्पादन प्रकल्पाच्या विरोधात स्थानिक ग्रामस्थांनी तीव्र भूमिका घेत लक्ष्मी ऑर्गेनिक कंपनीला खुले पत्र लिहिले. ८०० ग्रामस्थांनी स्वाक्षरी केलेल्या या पत्रामध्ये सुरक्षिततेच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत अनेक गंभीर मुद्दे मांडले. हे खुले पत्र सध्या व्हायरल झाले आहे. ग्रामस्थांनी पत्रात म्हटले की, जगातील अनेक प्रगत देशांनी पीफास रसायनांना पर्यावरण आणि मानवी आरोग्यासाठी घातक मानत त्यावर बंदी किंवा कडक निर्बंध लागू केले. विशेषत: युरोपियन युनियनने या रसायनांच्या उत्पादन आणि वापरावर कठोर नियम लागू केले आहेत. अशा परिस्थितीत, हीच रसायने भारतातील सुपीक जमिनीवर उत्पादनासाठी आणली जात आहेत. यासोबतच ग्रामस्थांनी इटलीतील मिटेनी कंपनीच्या प्रकरणाचा दाखला देत गंभीर चिंता व्यक्त केली.

मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनांची पूर्तता सरकारवर बंधनकारक नाही

राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषदेत दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी सरकारवर बंधनकारक करता येऊ शकत नाही, असा निकाल देत दिल्ली उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने एकल-न्यायाधीशांनी आधी दिलेला निकाल रद्द केला. एकल न्यायाधीशांनी मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी धोरण तयार करण्यासाठी पावले उचलण्याचे आदेश सरकारला दिले होते.

हायकोर्टाचा निर्वाळा

■ नवी दिल्ली

हे प्रकरण दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि 'आप'चे नेते अरविंद केजरीवाल यांनी २९ मार्च २०२० रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेशी संबंधित होते. त्या पत्रकार परिषदेत त्यांनी सर्व घरमालकांना गरीब आणि दरिद्री भाडेकरूंकडून भाड्याची वसुली पुढे ढकलण्याची विनंती केली होती.

भाडेकरू गरिबीमुळे भाडे देऊ शकत नसेल, तर सरकार त्याच्या वतीने भाडे भरेल, असे आश्वासनही तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी दिल्याचा दावा करण्यात आला होता. कोविड-१९ च्या आर्थिक मंदीनंतर भाडे भरू न शकणारे भाडेकरू असल्याचा दावा करणाऱ्या रोजंदारी मजुरांसह याचिकाकर्त्यांच्या एका गटाने हे आश्वासन लागू करण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल केली होती. जुलै २०२१ मध्ये न्यायमूर्ती प्रतिभा एम. सिंह यांनी असा निकाल दिला की, मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषदेत दिलेले आश्वासन किंवा वचन अंमलबजावणीयोग्य आहे. त्यामुळे, एकल न्यायाधीशांनी दिल्ली सरकारला मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी धोरण तयार करण्याकरिता पावले उचलण्याचे आणि मुख्यमंत्र्यांचा प्रस्ताव लागू न करण्याचा निर्णय घेतल्यास त्याची कारणे देण्याचे आदेश दिल्ली सरकारने दिले होते. दिल्ली सरकारने या निकालाच्या विरोधात अपील दाखल केले होते. त्याच्या सुनावणीनंतर उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती सी. हरी शंकर आणि न्यायमूर्ती ओम प्रकाश शुक्ला यांचा समावेश असलेल्या खंडपीठाने आधीच्या निकालात बदल करत नमूद केले की, पत्रकार परिषदेतील अशी आश्वासने न्यायालयाच्या निर्देशांद्वारे अंमलात आणता येणार नाहीत. अशा आश्वासनांच्या अंमलबजावणीसाठी केलेली मागणी चुकीची आहे.

राहुरीत प्राजक्त तनपुरेंची माघार

फडणवीसांच्या फोननंतर कलाटणी

■ अहिल्यानगर

भाजपा नेते शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या राहुरी विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत अखेरच्या क्षणी नाट्यमय घडामोडी घडल्या. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते तथा माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा निर्णय मागे घेतल्याने राजकीय समीकरणांना कलाटणी मिळाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरून झालेल्या संपर्कानंतर तनपुरेंची निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतल्याचे बोलले जात आहे.

या निवडणुकीत भाजपाकडून दिवंगत कर्डिले यांचा मुलगा अक्षय कर्डिले यांना उमेदवारी देण्यात आली आहे. दुसरीकडे माजी आमदार प्राजक्त तनपुरे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून किंवा अपक्ष म्हणून रिंगणात उतरणार, अशी जोरदार चर्चा सुरू होती. पण तनपुरे यांनी शेवटच्या क्षणी माघार घेतल्यामुळे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून गोविंद मोकाटे यांनी उमेदवारी अर्ज भरला.

दरम्यान, आज सकाळी भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी तनपुरे यांची भेट घेतली. या बैठकीत बंद दाराआड चर्चा झाली. यावेळी तनपुरे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरूनही चर्चा घडवून आणण्यात आली. फडणवीस यांनी तनपुरे यांच्याशी थेट संवाद साधत राहुरी मतदारसंघातील विकासकामे आणि प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी राज्य सरकारकडून शंभर टक्के सहकार्य केले जाईल, असे आश्वासन दिले. त्यानंतर तनपुरे यांनी कार्यकर्त्यांशी बोलून निर्णय घेतो, असे म्हटले होते. परंतु त्यांनी उमेदवारी अर्ज भरलाच नाही.

ट्रम्प यांची इराणला नवी धमकी

एका रात्रीत संपवू! कदाचित आजच

■ वॉशिंग्टन

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी, इराणला आज नवी धमकी दिली. ते म्हणाले की,

इराणला एका रात्रीत संपवले जाऊ शकते आणि हे उद्या रात्रीपर्यंतही घडू शकते. आज गाजावाजा करून घेतलेल्या विशेष पत्रकार परिषदेत त्यांनी इराणमधून एका अमेरिकी वैमानिकाला इराणमधून बाहेर काढण्याच्या ऐतिहासिक बचाव मोहिमेची भरपूर प्रशंसाही केली. मात्र इराणने विमान पाडल्याबद्दल शब्दही काढला नाही.

डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की, अमेरिकेच्या १५५ सैनिकांनी इराणमध्ये घुसून दोन वैमानिकांना सुरक्षित बाहेर काढले. अमेरिकन लष्करांसाठी एक मोठे यश आहे. ही मोहिम ऐतिहासिक होती. आतापर्यंत जगात अशी धाडसी मोहिम कुठेच झाली नव्हती. या धाडसी मोहिमेत आमच्या सैनिकांनी १५ विमाने वापरली. मात्र या मोहिमेचा हा प्लॅन कोणी लिक केला, याचा आम्ही शोध घेत आहोत.

रेल्वेचा ९५ टक्के वक्तशीरपणाचा दावा

प्रवासी उशिराच्या तक्रारींनी हैराण

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ मुंबई -

२०२५-२६ या वर्षासाठी मध्य रेल्वेने ९२ टक्के आणि पश्चिम रेल्वेने ९५ टक्के वक्तशीरपणाचा दावा केला आहे. मात्र उपनगरीय रेल्वे सेवा नियमितपणे उशिराने धावत असल्याची तक्रार प्रवाशांकडून केली जात आहे. गर्दीच्या वेळेत गाड्या साधारण १० ते २० मिनिटे उशिरा येत असल्याचा प्रवाशांचा आरोप आहे. यामुळे रेल्वेच्या वक्तशीरपणा मोजण्याच्या पद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. सध्याच्या निकषांनुसार ५ ते १० मिनिटे उशिरा धावणाऱ्या गाड्यांनाही 'वेळेवर' मानले जाते. त्यामुळे वक्तशीरपणाची आकडेवारी वास्तवापेक्षा जास्त दाखवली जात असल्याचा आरोप केला जात आहे. साधारणपणे एका गाडीला उशीर

झाला की, त्याचा परिणाम संपूर्ण फेऱ्यांवर होतो. फलाटांवर गर्दी वाढते आणि पुढील गाड्यांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी चढतात. प्रामुख्याने वातानुकूलित लोकलमुळे गर्दीचे नियोजन जास्त बिघडते. प्रवाशांच्या तक्रारीनुसार, मध्य रेल्वेच्या प्रवाशांना याचा सर्वाधिक फटका बसतो. गर्दीच्या वेळी गाड्यांना उशीर होणे हा नियमच झाला आहे. उशिराची माहिती देणाऱ्या घोषणांचा अभाव, पूर्वसूचना न देता घेतलेले ब्लॉक, वेगमर्यादा, सिग्नलमधील बिघाड, रुळांवरील अतिक्रमण आणि देखभालीची कामे ही गाड्या उशिरा धावण्यामागची प्रमुख कारणे आहेत. पश्चिम रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक पंकज सिंह यांनी पायाभूत सुविधांच्या विकासकामांमुळे » पान ७ वर

शरद पवारांची व्हीलचेअरवरून शपथ

ज्योती वाघमारेंचा मराठी बाणा

■ नवी दिल्ली

संसदेत आज राज्यसभेच्या नवनिर्वाचित १९ सदस्यांचा शपथविधी सोहळा पार पडला. यावेळी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्हीलचेअरवर बसून शपथ घेतली तर शिंदेसेनेच्या ज्योती वाघमारे यांनी मराठी संस्कृतीचा बाणा जपत नऊवारी, नथ, कपाळावर कुंकवाची आडवी रेघ या पारंपरिक पेहरावात शपथ घेण्यासाठी आल्या होत्या.

१० राज्यांतील राज्यसभा सदस्यांचा कार्यकाळ एप्रिलमध्ये संपत असल्याने ३७ जागांसाठी द्विवार्षिक निवडणूक पार पडली. त्यात निवडून आलेल्या ४ राज्यांच्या सदस्यांनी आज शपथ घेतली. महाराष्ट्रातील माया आयवते (भाजपा), शरद पवार (राष्ट्रवादी शरद पवार), रामराव वडकुते (भाजपा), ज्योती वाघमारे (शिंदेसेना), रामदास आठवले (आरपीआय-ए) यांनी शपथ घेतली. तमिळनाडूतील कॉन्स्टँटिन रवींद्रन (डीएमके), खिस्तोफर मणिकम (काँग्रेस), एल. के. सुधीश (द्रमुक), एम. थंबीदुराई (एआयएडीएमके), तिरुची शिवा (डीएमके), अंबुमणी रामदास (पीएमके), पश्चिम बंगालमधील बाबुल बराल (तृणमूल काँग्रेस), विश्वजित सिन्हा (भाजपा), मेनका गुरुस्वामी (तृणमूल काँग्रेस), राजीव कुमार (तृणमूल काँग्रेस), रुक्मिणी मल्लिक (तृणमूल काँग्रेस), ओडिशातील मनमोहन सामल (भाजपा), संतृप्त मिश्रा (बीजेडी), » पान ७ वर

मराठी-जैनांमध्ये भांडणे लावू नका

हुंडिया यांचा नयपद्मसागरांना इशारा

■ मुंबई

छत्रपती महाराणी ताराराणी जैन होत्या, असे वक्तव्य करून वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या जैन मुनी नयपद्मसागर यांच्यावर जैन समाजाचे नेते व उद्योजक हार्दिक हुंडिया यांनी जोरदार टीका केली. त्यांच्या वक्तव्यामुळे मराठी आणि जैन समाजामध्ये तणाव निर्माण होऊ शकतो. असे नमूद करत त्यांनी हे विधान बेजबाबदार असल्याचे म्हटले. हार्दिक हुंडिया यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, मराठी आणि जैन बांधवांमध्ये भांडणे लावण्याचे काम करू नका. नयपद्मसागर यांना मुनी म्हणून जर पुरेसे ज्ञान नसेल तर मुंबई सोडून गुरूकडे जाऊन ज्ञानप्राप्ती करा. त्यांनी केलेले वक्तव्य माफी करण्यालायक नाही. अशा प्रकारचे विधान करण्याची काहीच गरज नव्हती. साधू-संतांचे कार्य हे समाजात नैतिकता, अध्यात्म आणि शांततेचा संदेश देणे हे असते. मात्र, अनावश्यक वादग्रस्त वक्तव्यांमुळे समाजात गैरसमज निर्माण होतात. त्यांनी पुढे राजकीय व सामाजिक क्षेत्रातील नेत्यांनाही आवाहन केले की, अशा वादग्रस्त व्यक्तींपासून दूर राहावे.

अल्पवयीन असताना अत्याचार केला

भिगवण प्रकरणातील पीडितेचा जबाब

■ पुणे

पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील भिगवण येथील अपहरण प्रकरणाला ४७ दिवसांनंतर धक्कादायक वळण मिळाले असून, पीडित तरुणीने पोलिसांसमोर दिलेल्या जबाबातून गंभीर आरोप उघड झाले आहेत. मुख्य आरोपी झहीर शेख याने पीडिता अल्पवयीन असताना तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप असून, फोटो नातेवाईकांना पाठवण्याची धमकी देत तिला त्रास दिला होता.

१७ फेब्रुवारी २०२६ रोजी ही घटना घडली होती. पीडितेचे २२ फेब्रुवारीला लग्न ठरले होते. लग्नाच्या खरेदीसाठी ती आई आणि भावासोबत बाहेर पडली

पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल

असताना झहीर शेख, त्याचा भाऊ आयान शेख आणि अझर शेख यांनी भररस्त्यात तिचे अपहरण केले. विरोध करणाऱ्या आईला मारहाण करून आणि डोळ्यात मिरचीपूड टाकून आरोपींनी तिला जबरदस्तीने वाहनात बसवले. अपहरणानंतर पीडितेला खंडाळा मार्गे बारामती येथे नेण्यात आले. तेथे तिला व तिच्या कुटुंबियांना जीवे मारण्याची धमकी देत, आम्ही स्वतःच्या इच्छेने लग्न केले असा व्हिडिओ जबरदस्तीने रेकॉर्ड करण्यास भाग पाडले.

तसेच कोऱ्या स्टॅम्प पेपरवर तिच्या सह्या घेण्यात आल्याचेही तिने सांगितले. पीडितेने ४ एप्रिल रोजी पोलिसांना दिलेल्या जबाबात, आरोपीने यापूर्वीही धमक्या देत तिचे अश्लील फोटो नातेवाईकांना पाठवण्याची भीती दाखवून वारंवार अत्याचार केल्याचा आरोप केला आहे.

मुख्यमंत्री पेमा खांडू यांची सीबीआय चौकशी करा! सुप्रीम कोर्टाचे आदेश

■ नवी दिल्ली

आपली पत्नी आणि कुटुंबातील सदस्यांना निविदा प्रक्रिया पार न पाडता विकासकामांची कंत्राटे दिल्याप्रकरणी अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खांडू यांची सीबीआयमार्फत चौकशी करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. एका स्वयंसेवी संस्थेने दाखल केलेल्या जनहित याचिकेवरील सुनावणीप्रसंगी न्यायालयाने हे आदेश दिले.

न्या. संदीप मेहता, न्या. विक्रम नाथ आणि न्या. एन अंजारिया यांच्या त्रिसदस्यीय खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. मुख्यमंत्री पेमा खांडू अरुणाचल प्रदेशचा कारभार आपली खासगी कंपनी असल्यासारखा चालवतात, असा आरोप याचिकेमध्ये करण्यात आला होता. सुमारे १ हजार २४५ कोटी रुपयांच्या कंत्राटांचे मुख्यमंत्री खांडू यांनी वाटप केले. त्याव्यतिरिक्त २५ कोटी रुपयांची कामे कार्यादेशाद्वारे ठेकेदारांना वाटली. यातील बहुतांश कामे खांडू यांनी आपल्या पत्नीच्या नावे असलेल्या मे.ब्रँड इगल्स या कंपनीला दिली.

नवाकाळ
Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial

छोट्या जाहिराती

संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३

पाहिजेत

मुंबईमध्ये पेशंटसाठी 12/24 तास आया, वॉर्डबॉय पाहिजेत. पगार (30,000-90,000) **9820628009** {NC254722}

प्रिंटिंग आणि गारमेंट क्षेत्रातील हेल्पर आणि कारागीर पाहिजेत कुर्ला (पुर्व) **9833380922** {NC260036}

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर/ जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी ''बायका/ मुली'' पाहिजेत. पगार 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007/ 9892575886** दादर वेस्ट {NC254740}

पाहिजेत टर्नर, फिटर, हॉबिंग, गिअर ग्राइंडिंग ऑपरेटर. मीरा रोड. **7304883376** {NC260039}

कोलाबा येथे रेस्टॉरंटसाठी हेल्पर, वेटर, ऑर्डर टेकर, मोरी बॉय, किचन हेल्पर आणि ज्यूस मेकर पाहिजेत. संपर्क- **9004480008** {NC260033}

पाहिजेत हेल्पर-११,०००/-, वेल्डर-१८,०००/-, फायबर मोल्डर- १८,०००/-, संपर्कः- **9869050766** {NC260042}

बिस्लेरी बॉटलच्या डिलिव्हरीसाठी मुले पाहिजेत. दादर, प्रभादेवी. संपर्कः- **9892307267 / 7666255660** {NC260044}

देशपांडे फाउंडेशन या संस्थेचे प्रचारक म्हणून काम करून चांगले उत्पन्न मिळवा. तुमच्या राहत्या भागात काम. वयाचे बंधन नाही. **9172647505** या व्हॉटसअप नंबरवर आपला bio data पाठवा. {NC260015}

वसई ईस्ट सातिवली येथे पंचिंग मशीन (पेपर) ऑपरेटर पाहिजे, अनुभव कमीत कमी ३ वर्ष, **9820858346** {NC260026}

अनुभवी एक्का वार्निश युव्हि सक्युराय युव्हि फॉयलिंग पंचिंग मशीन ऑपरेटर पाहिजेत अंधेरी ईस्ट संदीप- **9769051049** {NC254654}

पाहिजेत

अंबरनाथ स्टेशनजवळ प्रिन्टिंग प्रेसमध्ये ऑफसेट GTO प्रिंटर पाहिजे. संपर्कः **9819853443/ 9321020846/ 9820892324** {NC260019}

मालाड/ गोरेगाव पूर्व येथे कंत्राटी पद्धतीने हाऊसकिपींग स्टाफची गरज आहे. ग्रोस पगार १५०००/-. पीएफ, ईएसआयसी, बोनस व साप्ताहीक सुट्टी संपर्कः **9833557505** {NC260050}

दादरला मेनपावर ऑफीसमध्ये फोन अटेन्ड करण्यासाठी मुली पाहिजेत. पगार 15,000/- -18,000/- **(9920270431)** {NC260051}

बोरीवली पूर्व येथे इलेक्ट्रॉनिक्स कंपनीला पीसीबी असेम्बलिंग आणि टेस्टिंगसाठी ITI Electronics/ Electrical टेक्निशियन Electronics Diploma with Experience मुले/मुली पाहिजेत. Whatsapp: 9820302869/ 9819065988 Email: atul@alphasmps.com **{NC260052}**

सिक्युरिटी गार्ड हाऊसकीपिंग पाहिजे व माळी कांदिवली गोरेगाव विलेपार्ले नालासोपारा - **8097507698** {NC260056}

पेस्ट कंट्रोल कामासाठी बोरिवली/ वसई ऑफीस टेक्निशियन/ सेल्ससाठी मुले/मुली पाहिजे. **9819660542** {NC260055}

सीएसटी मुंबई येथील पेस्ट कंट्रोल कंपनीला फवारणी करणारी माणसे पाहिजे. पगार- 12,000 + गाडी भाडे + कमिशन **8356824867** {NC260049}

निराधार महिला आणि पुरुषांसाठी केअर टेकर नोकरी (पगार+ जेवण + निवास मोफत) घरकुल केअर सेंटर : **9819426634/ 9969529162** {NC260054}

Situation Vacant

HIRING, WELL EDUCATED, GOOD EXPERIENCED IN CARGO, COURIER AND LOGISTICS, INDUSTRY ALLOVER MUMBAI, BHIVANDI, VASAI. CALL FOR INTERVIEW/ WHATSAPP RESUME **9833343566**. BLUEAIR CARGO AND PVT. LTD. (BLUEAIR LOGISTIC) {NC260014}

Required pest control operator technician location chembur **9869004045 / 9082382692** {NC260029}

Need office girl for admin/ back office work in santacruz (w) No.: **7710058797** {NC260053}

शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC260031}

वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

– मॅनेजर, 'नवाकाळ'

दु:ख तळघरात कोंडून बाहेर पडले आहे! साथ द्या

पान १ वरून

अजितदादांच्या जाण्याने आमच्या संपूर्ण कुटुंबाला मोठे दुःख झाले आहे. त्यांच्याबद्दल मनात आदर आहे, हे मान्यच करावे लागेल. सध्या पवार कुटुंबात कुटुंबप्रमुख म्हणून माझ्यावर जबाबदारी आहे. त्यामुळे आम्ही बारामतीची ही पोटनिवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही या निवडणुकीत कोणाचाही प्रचार करणार नाही. अमित शहा आणि मोदींचा फोटो असणे गैर नाही. कारण तो त्यांचा मित्रपक्ष आहे, पण माझा फोटो बॅनरवर घेणे चुकीचे आहे.

बारामती आणि राहुरी पोटनिवडणुकीत काँग्रेसने उमेदवार देण्याचा निर्णय घेतला आहे. यावर भाष्य करताना पवार म्हणाले की, मविआतील घटक पक्ष म्हणून काँग्रेसला माघार घेण्याबाबत सांगण्याची आम्हाला गरज वाटत नाही. राजकारणात पराभव झाला तरी लोक लोकांची कामे करण्यासाठीच मैदानात उतरत असतात. तर बारामती पोटनिवडणुकीत उमेदवार देण्यावरून राष्ट्रवादीचे खासदार पार्थ पवार यांनी काँग्रेसवर टीका केली होती. याबाबत शरद पवार म्हणाले की, राजकारणामध्ये अशा प्रकारचे वक्तव्य करण्यासाठी परिपक्वता लागले. राजकारणातील परिपक्वता पार्थ पवार यांच्याकडे आहे की नाही याची माहिती नाही.

आज सकाळी अर्ज भरण्यापूर्वी सुनेत्रा पवार सर्वप्रथम काटेवाडी येथून कन्हेरी हनुमान मंदिरात गेल्या. या मंदिरात त्यांनी पूजा केली. त्यानंतर त्यांनी बारामतीतील शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. तिथून त्यांनी अजित पवार यांच्या विद्या प्रतिष्ठान येथील स्मृतिस्थळी जाऊन त्यांना अभिवादन केले. स्मृतिस्थळाकडे जाताना त्यांचे डोळे पाणावले होते. त्यानंतर मोरोपंत नाट्यगृहात मेळावा पार पडला. या मेळाव्याला प्रफुल्ल पटेल, तटकरे, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील या राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हेही उपस्थित होते. देवेंद्र फडणवीस आज तामिळनाडू प्रचार दौऱ्यावर असल्याने ते उपस्थित नव्हते. या मेळाव्यात भाषण करताना सुनेत्रा पवार म्हणाल्या की, अवघ्या दोनच महिन्यांपूर्वी आपण सर्वांनी आपले लाडके नेते आदरणीय दादांना गमावले. आज त्या पार्श्वभूमीवर बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक होत आहे. मी आज अर्ज दाखल करत आहे. मला स्वप्नातही वाटले नव्हते की, बारामतीत ही पोटनिवडणूक होईल. दादा आपल्यात नाहीत, असे मला अजूनही वाटत नाही. मला ते मान्यही नाही, पण नियतीने हा काळ माझ्यावर व तुमच्यावर आणला आहे. दादांचे जाणे ही केवळ माझी व माझ्या कुटुंबाची वैयक्तिक हानी नाही, तर बारामती, महाराष्ट्र व देशाचीही हानी झाली आहे. दादांसाठी बारामती म्हणजे आईसारखी होती. बारामतीचा केवळ प्रत्येक कार्यकर्ता नाही, तर बारामतीचा प्रत्येक नागरिक हा दादासाठी खरा पांडुरंग होता बारामतीकरांची सेवा म्हणजेच पांडुरंगाची सेवा हाच दादांचा विश्वास आणि आधार होता. गेल्या ३५-३६ वर्षांत तुम्ही सर्वांनी अजित पवारांना प्रचंड मताधिक्याने निवडून दिले. दादांच्या तळमळीने प्रत्येक बारामतीकर आपणच उमेदवार आहोत, या भावनेने दादांची निवडणूक नेहमीच हातात घेत होता. त्यामुळेच दादांनी प्रत्येक वेळी आपल्या स्वतःच्याच मताधिक्याचे विक्रम मोडीत काढले. तुमच्या मताचा बोजा माझ्यावर आहे, म्हणून मी २४ तास काम करतो असे दादा नेहमी म्हणायचे. दादांच्या माघारी ही पहिलीच निवडणूक आहे. त्यामुळे ही केवळ निवडणूक नाही. तर दादांना श्रद्धांजली अर्पण करण्याची प्रत्येक बारामतीकराला संधी आहे. आदरणीय पवार साहेबांनी बारामतीला विकासाचा दृष्टिकोन दिला. दादांनी त्यावर आपल्या कष्टांनी रंग भरले. बारामतीला फुलवले, जगवले आणि जागतिक दर्जाकडे नेले. आपल्या बारामतीची प्रतिष्ठा जराही कमी होऊ देणार नाही, हे बारामतीकरांना मी यापुढेही वचन देते. बारामती तालुका हा जगातील सर्वात विकसित सर्वात प्रगत तालुका बनवेन, हे दादांचे स्वप्न नव्हते, तर ही दादांची जिद्द होती. एक ध्यास होता. दादांना बारामती एक जागतिक दर्जाचे शहर बनवायचे होते. हे स्वप्न पूर्ण होणार असतानाच नियतीने त्यांना आपल्यातून नेले. जीवात जीव आहे तोपर्यंत बारामतीकरांची सेवा करतच राहीन, हे शब्द त्यांनी खरे केले. दादांची जागा कोणीच घेऊ शकत नाही. पण त्यांच्या विकासाच्या विचारांना पुढे नेण्याचा निर्धार मात्र मी केला आहे. दादा शब्दाला जागणारे होते दादांचा एकही शब्द खाली पडू देणार नाही दादांना साक्षी ठेवूनच मी तुम्हाला हेही वचन देते की, माझ्यासाठी केवळ पार्थ आणि जय हेच माझे कुटुंब नाही. तर संपूर्ण बारामती हा माझा परिवार आहे. प्रत्येक बारामतीकर माझ्या कुटुंबाचा सदस्य आहे. या कुटुंबाच्या विकासासाठी मी आयुष्यभर झटत राहीन, हा शब्द माझाही आहे. दादांच्या अचानक जाण्याने अनेक कार्यकर्त्यांचे मनोबल खचले, पण काळजी करू नका. एकाही कार्यकर्त्याला वाऱ्यावर सोडणार नाही. दादांचा जनता दरबार यापुढे हे तसाच सुरू राहील. बारामतीचा विकास पूर्वीसारखाच वेगाने सुरू राहील. कोणत्याही विकासकामाची गती व गुणवत्ता यापुढे कमी होऊ देणार नाही. तुम्ही सर्वजण माझ्या पाठीशी ठामपणे उभे राहाल. तुम्ही माझ्यावर दाखवलेला विश्वास कधीही फोल ठरू देणार नाही.

दरम्यान, बारामती मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष निवडणूक लढवणार नसेल तर काँग्रेस पक्ष निवडणूक लढवेल अशी भूमिका काँग्रेस पक्षाने जाहीर केली होती. त्यानुसार काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते माजी मंत्री महादेव जानकर व वंचित बहुजन आघाडीचे नेते माजी खा. ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्याशीही चर्चा केली होती. दोन्ही पक्षांनी काँग्रेसला पाठिंबा दिला आहे. त्यानुसार ॲड. आकाश मोरे यांनी आज काँग्रेस पक्षाकडून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. मोरे हे व्यवसायाने वकील असून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव आहेत. त्यांचे वडील विजयराव मोरे हे काँग्रेस पक्षाचे विधान परिषदेचे आमदार होते.

भोंदू खरातनंतर एरंडे प्रकरणात ८ महिलांची ओळख पटली

नाशिक

भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण गाजत असतानाच नाशिकचेच महिलांवरील अत्याचार आणि अश्लील व्हिडिओंशी संबंधित दुसरे पत्रकार रवींद्र एरंडे प्रकरण उघड झाले. यामध्ये ८ महिलांची ओळख पटली. त्यामुळे आरोपीच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पोलीस तपासात मिळालेल्या माहितीनुसार, रवींद्र एरंडे याच्या टॅब आणि हार्डडिस्कमधून तब्बल १२१ महिलांच्या लैंगिक शोषणाचे व्हिडिओ आढळले. या व्हिडिओंची तपासणी केल्यानंतर आतापर्यंत ८ पीडित महिलांची ओळख पटवण्यात पोलिसांना यश आले. उर्वरित महिलांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. या प्रकरणात पोलिसांनी एरंडेच्या ताब्यातून चार मोबाईल फोन, दोन पेनड्राईव्ह आणि एक मेमरी कार्ड जप्त केले. या सर्व उपकरणांमधील डेटा रिकव्हर करण्याचे काम सध्या सुरू असून, त्यातून आणखी धक्कादायक माहिती मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. न्यायवैद्यक पथकानेही एरंडेच्या कार्यालयाची झडती घेऊन तांत्रिक पुरावे गोळा केले आहेत.

निवासी डॉक्टरची भाड्याच्या घरात आत्महत्या

बीड – बीडच्या अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी डॉक्टर डॉ. मंदार दाभाडे यांनी भाड्याच्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या घटनेमुळे अंबाजोगाई शहरासह वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

डॉ. दाभाडे हे अंबाजोगाईतील चनई परिसरातील रोहिदास नगर येथे भाड्याच्या घरात राहत होते. बराच वेळ त्यांच्या खोलीतून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने संशय निर्माण झाला. त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

कॅप्टनच्या मुलीला २.२८ कोटी रुपये द्या
शिपिंग कंपनीला उच्च न्यायालयाचा दणका

मुंबई

आपल्या कर्मचाऱ्याप्रती असलेल्या जबाबदारीतून हात झटकणाऱ्या खासगी शिपिंग कंपनीला उच्च न्यायालयाने मोठा दणका दिला. रजेवर असताना मृत्यू झालेल्या एका जहाज कॅप्टनच्या मुलीला २.२८ कोटी रुपयांची भरपाई द्या, असे आदेश न्यायमूर्ती श्रीराम मोडक आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने शिपिंग कंपनीला दिले. या निर्णयाने दिवंगत कॅप्टनच्या मुलीला तब्बल १४ वर्षांनंतर न्याय मिळाला आहे.

कॅप्टन बलदेव सिंग धिंसा हे १९९० पासून 'टीके शिपिंग प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीत कार्यरत होते. १३ नोव्हेंबर २०१२ रोजी ते हक्काच्या

रजेवर असताना हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर त्यांची मुलगी अंबिका धिंसा यांनी कंपनीकडे मृत्यू पश्चात मिळणाऱ्या भरपाईचा दावा केला होता. मात्र, धिंसा यांचा मृत्यू रजेवर असताना झाला असून, ते कंपनीच्या सेवेत नव्हते, असे तांत्रिक कारण पुढे करत कंपनीने भरपाई देण्यास नकार दिला होता. खंडपीठाने या प्रकरणावर सुनावणी करताना कंपनीच्या भूमिकेवर तीव्र शब्दांत ताशेरे ओढले. भरपाई टाळण्यासाठी प्रत्येक संभाव्य अडथळा निर्माण करण्याचे हे एक उत्तम उदाहरण आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. गेल्या १४ वर्षांपासून मुलीला आपल्या हक्काच्या पैशांसाठी लढा द्यावा लागणे ही अत्यंत 'दुर्दैवी' बाब असल्याचे न्यायालयाने म्हटले.

नांदेडमध्ये शिंदेसेनेच्या कार्यकर्त्याची हत्या
गेल्या तीन दिवसांत पाचवा खून

नांदेड

नांदेड शहरात वाढत्या गुन्हेगारीने चिंता वाढली. आज पहाटे शिंदे गटाचा कार्यकर्ता सोनू कल्याणकर याची निर्घृण हत्या झाली. मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडलेल्या कल्याणकर यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी धारदार शस्त्रांनी हल्ला करून त्यांची हत्या केली.

श्रीनगर परिसरात पहाटे दररोजप्रमाणे कल्याणकर मॉर्निंग वॉकसाठी गेले असताना तीन ते चार जणांनी त्यांना घेरले आणि पोटात व पाठीत वार करत रक्ताच्या थारोळ्यात सोडून पळ काढला. गंभीर जखमी झालेल्या कल्याणकर यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला.

सोनू कल्याणकर यांच्यावर तीन वर्षांपूर्वीही जीवघेणा हल्ला झाला होता. त्यावेळी रिंदा गँगशी संबंधित गोलू मंगनाळे याने त्यांच्यावर गोळीबार केला होता. त्या हल्ल्यात ते थोडक्यात बचावले होते. सध्या संबंधित आरोपी तुरुंगात असला तरी या हत्येमागे त्याचा काही संबंध आहे का, याचा तपास पोलीस करत आहेत. दरम्यान, नांदेडमध्ये गेल्या तीन दिवसांत सलग पाच खून झाल्याने शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले . २ दिवसांपूर्वी भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत वर्चस्वाच्या वादातून तिहेरी हत्याकांड घडले होते. या घटनेत अर्जितसिंह चव्हाण, मोहम्मद अरबाज आणि सय्यद आवेज यांचा मृत्यू झाला.

आजचे राशी भविष्य

मंगळवार ता. ७ एप्रिल २०२६

ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

मेष	रागावर नियंत्रण अतिशय आवश्यक आहे. इतरांशी वागताबोलताना संयम व शांती बाळगा. आज अनपेक्षित धनलाभाचा योग आहे.
वृषभ	उत्साही दिवस आहे. कामे वेगाने पूर्ण कराल. दीर्घकालीन फायद्याचे निर्णय घेता येतील.
मिथुन	संमिश्र फलिते मिळतील. संयम आणि शांतचित्ताने वाटचाल करा. पैशाचा ओघ चांगला राहील.
कर्क	नकारार्थी विचार दूर ठेवा. आज वेळेचे नियोजन अतिशय महत्त्वाचे ठरणार आहे. कामे वाढतील.
सिंह	नकारात्मक विचार दूर ठेवणे महत्त्वाचे ठरेल. हसूनखेळून वागण्याने प्रत्येकाच्या मनात स्थान मिळवता येईल.
कन्या	उत्साही दिवस आहे. जोडीदाराशी सुसंवाद राहील. कामातील कौशल्याची प्रशंसा होईल.
तूळ	स्पष्ट बोलणे उपयोगी ठरेल. संवादकौशल्याने अनेक गोष्टी साध्य होतील. तुमच्यासाठी दिवस खास ठरेल.
वृश्चिक	आत्मपरीक्षण गरजेचे ठरेल. मात्र अतिविचार टाळा. भावनिक होणे त्रासाचे ठरेल.
धनु	सुरुवातीला अडथळे येतील. मात्र नंतर धैर्याने त्यावर मात करता येईल. कामात लक्ष एकाग्र करा.
मकर	सर्व काही सुरळीत असेल. आत्मविश्वास वाढेल. सर्व बाबतीत सुधारणांच्या दिशेने पावले पडतील.
कुंभ	काही झटपट निर्णय घ्यावे लागतील. त्यातून ताण येऊ शकतो. पर्यटनातून त्यावर मात करता येईल.
मीन	आध्यात्मिक गोष्टी समाधान देतील. स्वत:त सुधारणा करण्यासाठी पावले उचला. आज थंड पदार्थ टाळा.

सायन रुग्णालयात पोलिसाला मारहाण करणारे दोघे निर्दोष

मुंबई

सायन रुग्णालयातील कॅज्युअल्टी विभागात कर्तव्यावर असलेल्या पोलीस हवालदाराला मारहाण आणि शिवीगाळ केल्याच्या आरोपातून दोन व्यक्तींची सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. पुरेसे पुरावे आणि साक्षीदारांच्या जबाबातील विसंगतीमुळे न्यायालयाने हा निकाल दिला. दहा वर्षांपूर्वीच्या घटनेत न्यायालयाने दिलेल्या या निर्णयामुळे सरकारी पक्षाला मोठा झटका बसला आहे.

१६ मार्च २०१६ रोजी सायन रुग्णालयाच्या अपघात विभागात आरोपी शेखर समुद्रपांडी नाडर आणि अक्षय प्रकाश चव्हाण यांनी गोंधळ घातल्याचा आरोप होता. यावेळी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या निलेश सुर्वे या पोलीस हवालदाराला आरोपींनी मारहाण करून सरकारी कामात अडथळा आणल्याचा दावा सरकारी पक्षाने केला होता.

लॉटरी

महाराष्ट्र सागरलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर सोमवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 14 • सोडत दिनांक 06/04/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख — **SL-03 : 5859**

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- — पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी **5859** — चिराग एन्टरप्रायझेस - नाशिक, किशोर लॉटरी सेंटर, सांगली

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **2270** — डायमंड कॉर्पोरेशन - बोरीवली, लकी लॉटरी - अहमदनगर, वैशाली लॉटरी - बोरीवली

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

बक्षिस										
तिसरे बक्षिस रु. 2000/-	0459	1029	1245	1850	2093	5336	6188	7579	7759	8516
चौथे बक्षिस रु. 1000/-	1060	1109	2248	2577	2581	3468	3572	4725	7269	8666
पाचवे बक्षिस रु. 500/-	2218	2742	2982	3426	4128	4251	5141	7436	7550	8201
सहावे बक्षिस रु. 200/-	1102	2543	3126	3235	3411	4029	5312	7506	7671	9609

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

[illegible]

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अधिक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

गणेशलक्ष्मी भाग्यशाली विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता • सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 14 • तिकिट कि. रु. 10/- • सोडत दिनांक 06/04/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 10000/- — **MG-00 : 3122**

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **3482**

तिसरे बक्षिस — **3523**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

बक्षिस										
1000/-	1036	1764	2169	2182	3126	5571	5595	6035	6803	6907
500/-	0077	0771	2201	4270	6637	7535	8685	8737	8869	8995
200/-	0734	1086	1606	5060	5140	5934	6486	6869	8194	9778

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

[illegible]

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अधिक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

महाराष्ट्र सह्याद्री धनलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत सायं. 4:30 वाजता • सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 14 • तिकिट कि. रु. 15/- • सोडत दिनांक 06/04/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 10000/- — **SL-03 : 1582**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

बक्षिस										
दुसरे बक्षिस रु. 2000/-	2054	2576	3153	4489	5036	5254	5280	5936	8444	9116
तिसरे बक्षिस रु. 1000/-	1646	3645	4044	4790	6824	7488	7578	7915	8082	8742
चौथे बक्षिस रु. 500/-	0077	0098	4502	6640	8707	9092	9192	9241	9355	9609

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

[illegible]

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अधिक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

महाराष्ट्र गजलक्ष्मी सोम विकली लॉटरी

निकाल • सोडत संध्या. 4:45 वाजता • सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 14 • तिकिट कि. रु. 20/- • सोडत दिनांक 06/04/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- — **GL-02 : 0097**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

बक्षिस										
दुसरे बक्षिस रु. 5000/-	1628	2064	4650	4803	5359	5790	7018	8098	8511	9124
तिसरे बक्षिस रु. 1000/-	2151	2748	2902	3354	5073	5239	5430	7161	8061	9090
चौथे बक्षिस रु. 500/-	1250	2853	4740	4741	6491	6956	7138	7535	8663	9933
पाचवे बक्षिस रु. 200/-	0539	0696	1071	1320	2789	3069	4412	4509	8353	8386

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

[illegible]

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अधिक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

शुभ राशी ता.०७/४/२०२६

४	०	५
४३	०३	५३
४८	०८	५८
१३०	१४५	२५८
२४८	२८०	३५७

नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

७ एप्रिल २०२६

जागतिक आरोग्य दिन

एकत्रित प्रयत्न आरोग्यासाठी, विज्ञानाची साथ भविष्यासाठी!

'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियान शुभारंभ

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री

सुनेत्रा अजित पवार
उपमुख्यमंत्री

अभियानाचे ध्येय

आरोग्यदायी समुदाय
जागरूक, सशक्त व आरोग्यदायी समुदाय निर्माण करणे

सक्षम आरोग्य सेवा
गावागावांत गुणवत्तापूर्ण व सर्वसमावेशक आरोग्य सेवा मजबूत करणे

सामूहिक सहभाग
समुदाय व शासन यांच्या सहभागातून आरोग्य चळवळ उभी करणे

प्रजा निरोगी, तर राज्य सशक्त

अभियानाचा कालावधी दिनांक १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७

राज्यातील प्रत्येक गाव निरोगी, जागरूक व सशक्त होणार

६५.२५ कोटी रुपयांचे पुरस्कार व प्रोत्साहन निधी

राज्यस्तर (ग्रामपंचायत)
- प्रथम पुरस्कार- ५ कोटी
- द्वितीय पुरस्कार- ३ कोटी
- तृतीय पुरस्कार- २ कोटी

विभागस्तर (ग्रामपंचायत)
- प्रथम पुरस्कार- १ कोटी (६)
- द्वितीय पुरस्कार- ७५ लाख (६)
- तृतीय पुरस्कार- ५० लाख (६)

जिल्हास्तर (ग्रामपंचायत)
- प्रथम पुरस्कार- २५ लाख (३४)
- द्वितीय पुरस्कार- २० लाख (३४)
- तृतीय पुरस्कार- १५ लाख (३४)

जिल्हा परिषद (राज्यस्तर)
- प्रथम पुरस्कार- ५ कोटी
- द्वितीय पुरस्कार- ३ कोटी
- तृतीय पुरस्कार- २ कोटी

पंचायत समिती (राज्यस्तर)
- प्रथम पुरस्कार- २ कोटी
- द्वितीय पुरस्कार- १.५ कोटी
- तृतीय पुरस्कार- १.२५ कोटी

उत्कृष्ट आरोग्य संस्था
- उत्कृष्ट ग्रामीण / उपजिल्हा रुग्णालय (राज्यस्तर) -७५ लाख
- उत्कृष्ट प्राथमिक आरोग्य केंद्र (राज्यस्तर) -५० लाख
- उत्कृष्ट उपकेंद्र (राज्यस्तर) -२५ लाख
- उत्कृष्ट प्राथमिक आरोग्य केंद्र (जिल्हास्तर) -१० लाख (३४)
- उत्कृष्ट उपकेंद्र (जिल्हास्तर) - ५ लाख (३४)

अभियानाची पंचसूत्री

1. लोकसहभाग
2. आरोग्य सेवा
3. प्रशासकीय समन्वय
4. मूल्यमापन
5. प्रोत्साहन

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री

सुनेत्रा अजित पवार
उपमुख्यमंत्री

प्रकाश आबिटकर
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

मेघना साकोरे - बोर्डीकर
राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

अधिक माहितीसाठी QR कोड स्कॅन करा

अधिक माहितीसाठी आपल्या जवळच्या शासकीय रुग्णालयाशी संपर्क साधा किंवा १०४ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करा

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन

क्रमांक:आरओसी२०२६-२७/क्र-५/डीव्ही५

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

संपादकीय

सार्वजनिक आरोग्यासाठी सकारात्मक मानसिकता

संपूर्ण विश्वाचे सुख हे सर्व प्रकारच्या सामाजिक आरोग्यामध्ये दडलेले आहे. सामाजिक स्वास्थ्य जर उत्तम स्वरूपाचे असेल आणि साक्षरता सर्वाधिक प्रमाणात साधली गेली असेल तर हे सामाजिक आरोग्य चांगल्या पद्धतीने राहायला मदत होते. आज जागतिक आरोग्य दिन आहे. जागतिक आरोग्य संघटनेने १९४८ ला पहिली आरोग्य सभा घेतली. म्हणून हा दिवस आरोग्य दिन म्हणूनही साजरा होतो. याशिवाय १९६० ला त्यांच्या आमसभेने ७ एप्रिल हा अधिकृतपणे आरोग्य दिन साजरा करण्याचा निर्णय घेतला होता. जागतिक स्तरावर अनेक प्रकारचे दिवस साजरे होतात ज्यामधून वेगवेगळ्या विषयांवर लोकांमध्ये जागृती निर्माण करण्याचा उद्देश ठेवला जातो. परंतु या दिनाचे महत्त्व फक्त त्या दिवसापुरते राहून चालणार नाही. तर त्या दिवसाच्यानिमित्ताने पूर्ण वर्षभर किंवा सातत्याने तो तो विषय अधिक प्रकर्षाने लोकांपर्यंत पोहोचेल आणि शासकीय यंत्रणांमधून सुद्धा त्या विषयाची योग्य ती दखल घेतली जाईल असा प्रयत्न होणे, तितकेच गरजेचे ठरते. आजचा जागतिक आरोग्य दिन म्हणजे पुन्हा एकदा लोकांना आपल्या आरोग्याविषयी जागृत करण्याचा एक महत्त्वाचा भाग ठरतो. यासाठीच जागतिक आरोग्य संघटनेने जाणीवपूर्वक सर्व जगासाठी एक संदेश असा दिला होता की, सक्रिय राहा आणि सकारात्मक वागा. या संदेशांमध्ये अतिशय महत्त्वाचा मुद्दा मांडला जातो. सक्रिय राहा याचा अर्थ तुमच्या आरोग्याची योग्य ती काळजी घेत सकारात्मक विचार विकसित करण्याचा उद्देश सांगितला गेलेला आहे. नकारात्मक मनस्थिती ही अनारोग्याला आमंत्रण देणारी असते हे भारतीय आयुर्वेदाने यापूर्वीच सिद्ध केलेले आहे. 'आरोग्यम खलुधर्म साधनम' अशा प्रकारचा संदेश भारताने प्राचीन काळापासून देऊन ठेवलेला आहे. आरोग्य ही सर्वात मोठी संपत्ती आहे. त्याकडे कोणत्याही प्रकारचे दुर्लक्ष करून चालणार नाही. दुर्दैवाने आज समाज सुशिक्षित झाला असला तरी सुद्धा बदलत्या जीवनशैलीने त्याच्यापुढे आरोग्याचे अनेक प्रश्न निर्माण केलेले आहेत. तो जीवनशैलीला शरण गेल्याने अनारोग्याला आमंत्रण देण्याचा प्रकार सगळीकडे पाहायला मिळतो. अगदी भारतासारख्या सर्वाधिक लोकसंख्या असलेला देशांमध्ये आरोग्याचा विचार प्राचीन काळापासून सांगितला गेलेला असताना देखील त्याकडे दुर्लक्ष केले गेले. आज भारतामध्ये हृदयरोग, मधुमेह, कर्करोग, गुडघेदुखी, रक्तदाब यासारख्या रोगांची संख्या सातत्याने वाढते आहे. भारत तर मधुमेहाची जागतिक राजधानी असल्याचे सांगितले जाते आहे, ही परिस्थिती भारताला भूषणावह नाही.

आत्मपरीक्षण झाले पाहिजे

जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने या सर्वांबाबत आत्मपरीक्षण करण्याची आवश्यकता आहे. ज्या भारताने एकेकाळी सगळ्या जगाला योगासनांसारखी सर्वात मोठी देणगी दिली, ज्या योगासनांनी सक्रिय राहण्याची आणि सकारात्मक मानसिकता ठेवण्याची शिकवण दिलेली आहे. किंबहुना तो एक आरोग्याचा संस्कार दिलेला आहे. परंतु भारतीयांनी त्याकडे दुर्लक्ष केले. ज्यावेळी योगासनं ही परदेशामध्ये लोकप्रिय होऊ लागली त्यावेळेला पुन्हा भारतीयांना आपल्या या प्राचीन योगसंपत्तीची जाणीव झाली. गेल्या दहा वर्षापासून आरोग्य विषयक जागृती वाढते आहे. कोरोना काळात तर लोकांना सामाजिक आरोग्याचे महत्त्व प्रकर्षाने लक्षात आले. २१ जून रोजी साजरा होणारा आंतरराष्ट्रीय योग दिन हा भारतीयांच्या सकारात्मक विचार आणि मानसिकतेला प्रोत्साहन देणारा ठरतो. आरोग्याची काळजी घेणे म्हणजेच नियमितपणे व्यायाम आणि नकारात्मक मानसिकता दूर ठेवणे हा त्यावरचा एक प्रभावी उपाय ठरतो. आरोग्याच्या तक्रारी या जितक्या शारीरिक असतात तितक्या त्या मानसिकही असतात. कोरोना काळामध्ये या नकारात्मक मानसिकतेचा खूप विपरीत परिणाम सगळ्या जगाने अनुभवलेला आहे. कोरोनासारखा व्हायरस आल्यानंतर मानसिक दृष्ट्या खचून जाणाऱ्यांची संख्या जगामध्ये प्रचंड प्रमाणात होती आणि म्हणूनच जगामध्ये जेवढे काही बळी गेले त्यातले ५० टक्के बळी हे मनाने खचलेल्या लोकांचे होते. जागतिक स्तरावरचा एकूण कोरोना बळींचा आकडा आणि भारतात गेलेले कोरोना बळी यामध्ये मोठा फरक आपल्याला पाहायला मिळतो. कारण भारतामध्ये समाज व्यवस्था शिवाय इथली कुटुंब व्यवस्था याच सकारात्मक मानसिकतेचे जतन करणारी किंवा संवर्धन करणारी ठरली होती.

सार्वजनिक स्वच्छताही महत्त्वाची

कोरोना काळामध्ये घाबरून नकारात्मक मानसिकता मानगुटीवर बसली आणि त्याचे दुष्परिणाम भोगावे लागले होते म्हणूनच भविष्यकाळामध्ये किंवा आपल्या दैनंदिन जीवनामध्ये आपल्याला आरोग्य उत्तम ठेवायचे असेल तर ध्यान धारणेपासून ते रोजच्या योगासनापर्यंत रोज थोडा वेळ देणे अत्यंत गरजेचे आहे. यातून निर्माण होणारी सकारात्मक मानसिकता ही माणसाला अधिक सक्रिय ठेवते आणि अनेक व्याधींपासून, रोगांपासून दूर राहायला मदत करते. आजचा हा जागतिक आरोग्य दिन आरोग्याविषयी काळजी घेण्याचा जसा संदेश देतो त्याबरोबरच सक्रिय मानसिकता विकसित करण्यासाठी अधिक महत्त्वपूर्ण मानला पाहिजे. दवाखाने, डॉक्टर्स या सगळ्या गोष्टी उपचारांसाठी आवश्यक आहेतच योग्य व्याधींवर आजारांवर योग्य वेळी उपचार होणे आवश्यक आहे. म्हणूनच सार्वजनिक आरोग्य व्यवस्था मजबूत असणे आणि उत्तम आरोग्य हा प्रत्येकाचा हक्क होणे ही येणाऱ्या काळाची मोठी गरज ठरते. आरोग्याच्या संवर्धनासाठी सार्वजनिक स्वच्छता हादेखील सर्वात मोठा भाग ठरतो. किंबहुना तो सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा मोठा भाग ठरतो. देशात राबवले जाणारे स्वच्छता अभियान हा केवळ सरकारी उपक्रम नसून तो प्रत्येकाच्या आरोग्य संवर्धनाचाच एक भाग ठरतो. या दृष्टीकोनातूनच स्वच्छतेच्या सवयी लावून घेणे प्रत्येकासाठी अनिवार्य ठरते. व्यक्तिगत आरोग्याच्या काळजीतूनच सामाजिक आरोग्याचे संवर्धन घडून येते. अजूनही लोकांना आरोग्यासाठी स्वच्छता ही गोष्ट लक्षात येऊ शकलेली नाही.

सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

कधीच कुणाला त्रास न देणाऱ्या चंद्राला सुद्धा ग्रहण आहे. मग आपण तर माणसं आहोत, आपल्याला त्रास होणार नाही असा विचारही करू नका.

पंचांग



मंगळवार ७ एप्रिल २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर
* चैत्र कृष्ण पंचमी
नक्षत्र - ज्येष्ठा
जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० वृश्चिक

रवी उदय- ०६-२९,
रवी अस्त- १८-५३

श्री चंद्रला देवीचा उत्सव, मच्छिंद्रनाथ यात्रा-मच्छिंद्रगड, शांतादुर्गा रथोत्सव- सदाशिवगड, जागतिक आरोग्य दिन

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

पाककृती

व्हेज हरियाली

★**साहित्य :** १ जुडी पालक, १ कप कोथिंबीर, १/४ कप पुदिन्याची पाने, ३-४ हिरव्या मिरच्या, १-इंच आले, ४-५ लसूण पाकळ्या, ८-१० काजू. मटार, बेबी कॉर्न. १ चमचा तूप/तेल, १ टीस्पून जिरे, १ चिरलेला कांदा, १ चिरलेली सिमला मिरची, १/२ कप दूध किंवा मलई, १/२ टीस्पून गरम मसाला, चवीनुसार मीठ.

★**कृती :** प्रथम गॅस पेटवा. त्यावर पातेले ठेवा. त्यात १ तांब्या पाणी घाला. पाणी उकळले की त्यात २-३ मिनिटे वाफवा. पालकचा रंग टिकवून ठेवण्यासाठी लगेच ते गरम पाण्यातून काढून थंड पाण्यात टाका. पालक, कोथिंबिरी, पुदिना, हिरवी मिरची, आले, लसूण आणि काजू यांची बारीक पेस्ट बनवा. आता गॅसवर कढईत तूप गरम करा, त्यात जिरे घाला आणि कांदा पारदर्शक होईपर्यंत परता. सिमला मिरची आणि मिश्र भाज्या घाला, ५-७ मिनिटे शिजवा. नंतर त्यात पालकची वाटलेली पेस्ट घाला. पालकाचा कच्चा वास निघेपर्यंत २-३ मिनिटे शिजवा. दूध किंवा ताजी मलई, मीठ आणि गरम मसाला घालून हलवा. ग्रेव्ही घट्ट होईपर्यंत २-३ मिनिटे उकळवा.

गुवाहाटीत राजस्थान आज मुंबईशी भिडणार

सलग तिसरा सामना जिंकण्याचा प्रयत्न करणार

उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेल्या आणि आतापर्यंत आपले दोन्हीही सामने जिंकलेल्या राजस्थान रॉयल्स संघ उद्या पाच वेळच्या विजेत्या मुंबई इंडियन्सशी भिडणार आहे. आयपीएलचा हा १३ वा सामना गुवाहाटीतील बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर खेळला जाणार आहे. मुंबईने आपल्या दोन सामन्यांपैकी केवळ पहिलाच सामना जिंकला. या स्पर्धेत सुस्थितीत राहण्यासाठी मुंबईचा संघ कोणत्याही परिस्थितीत विजय मिळवण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यासोबत राजस्थानचा संघ सलग तिसरा विजय मिळवण्यासाठी सज्ज झालेला आहे. मात्र मुंबई संघावर विजय मिळवणे राजस्थानसाठी सोपे नसणार आहे.

■ नवी दिल्ली

सध्या आयपीएलच्या गुणतालिकेत राजस्थान ४ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. तर मुंबईचा संघ २ गुणांसह सहाव्या क्रमांक आहे. राजस्थानची फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्ही मजबूत आहे. संघात वैभव सूर्यवंशीसारखा एक युवा शक्तिशाली फलंदाज असून, त्याच्यासोबत यशस्वी जैस्वाल, कर्णधार रियान पराग आणि शिमरॉन हेटमायर आहेत. जोफ्रा आर्चर आणि नांद्रे बर्गर यांच्यासारखे दोन उत्कृष्ट गोलंदाजही संघात आहेत. त्यासोबत मुंबईचा संघ संतुलित आहे. मात्र त्यांना त्यांच्या शेवटच्या सामन्यात दिल्लीकडून पराभव पत्करावा लागला. गुवाहाटी हे राजस्थानचे दुसरे घर आहे. संघ दरवर्षी येथे काही सामने खेळतो. या मैदानावरील खेळपट्टी फलंदाजांना दुसऱ्या डावात अनुकूल असते.

आसाममध्ये दिवसभर सहसा ढगाळ वातावरण असते. त्यामुळे गोलंदाजांच्या भूमिकेकडे पूर्णपणे दुर्लक्ष करता येत नाही. सुरुवातीच्या षटकांमध्ये गोलंदाजांना स्विंग मिळतो आणि ते सलामीच्या फलंदाजांना अडचणीत आणू शकतात. येथे चेन्नई आणि राजस्थान यांच्यातील शेवटच्या सामन्यात सुरुवातीच्या षटकांमध्ये आर्चर आणि बर्गर यांनी याचा फायदा घेतला होता. मुंबईने आपला शेवटचा सामना दिल्लीत खेळला. नियमित कर्णधार हार्दिक पंड्या संघातून अनुपस्थित होता. तो आजारी असल्यामुळे खेळू शकला नाही. त्याच्या जागी सूर्यकुमार यादवने कर्णधारपद भूषवले. गोलंदाजी आणि फलंदाजी या दोन्हीमध्ये संघाला त्याची उणीव जाणवली. या सामन्यात पंड्या खेळणार की पुन्हा सूर्यकुमार मुंबईचे कर्णधारपद भूषवणार, हे पाहणे बाकी आहे. आयपीएलमध्ये या दोन्ही संघांनी आतापर्यंत ३१ सामने खेळले.

जपानची कुस्तीपटू त्सुगुमीची २४ व्या वर्षी निवृत्ती जाहीर

■ टोकियो

पॅरिस ऑलिम्पिकमधील ५७ किलो वजनी गटात विजेतेपद पटकावणारी जपानची महिला कुस्ती चॅम्पियन त्सुगुमी साकुराईने वयाच्या अवघ्या २४ व्या वर्षी निवृत्त होण्याचा निर्णय घेतला. ती आता पश्चिम जपानमधील तिच्या मूळ प्रदेश कोची प्रांतासाठी क्रीडा सदिच्छा दूत म्हणून काम करेल. कुस्तीपटूंच्या नवीन पिढीला घडवेल. साकुराई २०२१, २०२२ आणि २०२३ मध्ये सलग तीन वेळा विश्वविजेती ठरली होती, त्यानंतर तिने २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आपल्या देशासाठी सुवर्णपदक जिंकले होते.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या निवड समिती व प्रशिक्षकांची घोषणा

■ पुणे

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनने २०२६-२७ हंगामासाठी निवड समिती आणि राष्ट्रीय संघ प्रशिक्षकांची घोषणा केली. राज्य अजिंक्यपद आणि निवड चाचणी स्पर्धांसाठी तज्ज्ञांवर जबाबदारी सोपवण्यात आल्याने आगामी स्पर्धांमध्ये महाराष्ट्राचा दबदबा कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

या निर्णयाची घोषणा सरचिटणीस डॉ. चंद्रजीत जाधव यांनी पुण्यात झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत केली. पुरुष आणि महिला गटासाठी निवडलेल्या समितीत सोमनाथ स्वामी (सांगली), तुषार मोरे (मुंबई उपनगर), रविराज परामने (ठाणे) आणि रत्नराणी कोळी (लातूर) यांचा समावेश आहे. कुमार व मुली गटासाठी निवड समितीत श्रीरंग बनसोडे (सोलापूर), विशाल पाटील (जळगाव), यतीश आक्रे (पालघर) आणि नंदिनी धुमाळ (मुंबई) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शोर व किशोरी गटासाठी अमोल चव्हाण (जालना), पंकज चवंडे (रत्नागिरी), रमेश लव्हाट (अहिल्यानगर) आणि तृप्ती गाडगीळ अग्रवाल (पुणे) यांची निवड समितीत नियुक्ती करण्यात आली.

कॅरम स्पर्धेत प्रशांत व सोनाली विजयी

■ मुंबई

रोटरी क्लब ऑफ मुंबई पार्ले श्वर आयोजित विलेपार्ल्यातील प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलात आयोजित केलेल्या ६ व्या राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत पुरुष एकेरी गटाच्या अंतिम सामना एकतर्फी झाला. माजी विश्वविजेत्या मुंबईच्या प्रशांत मोरेने ठाण्याच्या संजय मांडेचा २५-१०, २५-५ असा धुव्वा उडवत विजेतेपद काबीज केले.

तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत पुण्याच्या रहिम खानने रंगतदार लढतीत आपल्या अनुभवाच्या जोरावर उदयोन्मुख मुंबईच्या निलांश चिपळूणकरवर २१-२३, १५-१४ व २४-१४ असा विजय मिळवला. महिला एकेरी गटात अंतिम फेरीची लढत तीन सेटपर्यंत रंगली.

या लढतीत मुंबईची सोनाली कुमारी सरस ठरली. तिने ठाण्याच्या समृद्धी घाडीगावकरवर १२-२५, २५-१० व २५-५ अशी मात करत आपल्या विजयाची नोंद केली. महिलांच्या तिसऱ्या क्रमांकाच्या लढतीत ऐशा साजिद खानने तीन सेटपर्यंत रंगलेल्या लढतीत २०-२२, २४-५, २०-७ असा पराभव केला.

कोलकाता आणि पंजाब संघांचा आयपीएल सामना पावसामुळे रद्द

■ कोलकाता

कोलकात्यातील ईडन गार्डन्सवर आज झालेला कोलकाता नाइट रायडर्स आणि पंजाब किंग्जचा आयपीएलचा १२ वा सामना पावसामुळे रद्द झाला. त्यामुळे दोन्ही संघांना १-१ गुण मिळवला. पंजाबचा संघ आता आयपीएलच्या गुणतालिकेत ५ गुणांसह अव्वल स्थानावर पोहोचला,तर कोलकात्याचा संघ १ गुणासह सातव्या स्थानावर राहिल. कोलकात्याने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पंजाबचे वेगवान गोलंदाज झेवियर बार्टलेटने एकाच षटकात सलामवीर फिन ॲलन आणि तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेला कॅमेरॉन ग्रीन यांना झटपट बाद केले. त्यामुळे कोलकात्याची अवस्था २ षटकांत २ बाद १६ अशी झाली होती. त्यानंतर अजिंक्य रहाणे आणि रघुवंशी अनुक्रमे ८ आणि ७ धावांवर खेळत असताना अचानक जोरदार पाऊस आला. परिणामी कोलकात्याचा खेळ ३.४ षटकांत २ बाद २५ धावांवर थांबला. जो पुन्हा सुरू झालाच नाही.

तबेला मैदान-श्रमिक जिमखानाचा ११ एप्रिलला हिरक महोत्सवी सोहळा

■ मुंबई

वरळी कोळीवाडा येथील अमरप्रेम क्रीडा मंडळ व सर्व कबड्डीप्रेमी यांच्या संयुक्त विद्यमाने ना. म. जोशी मार्ग येथील तबेला मैदान-श्रमिक जिमखानाचा हिरक महोत्सवी सोहळा ११ एप्रिल रोजी सायंकाळी ५ ते १० या वेळेत साजरा करण्यात येणार आहे.

त्यानिमित्त पूर्वीचे मुंबई व आताच्या मुंबई शहरच्या सर्व वरिष्ठ पुरुष-महिला गटाच्या संघनायक व संघनायिकेंचा सन्मान करण्यात येणार आहे. मुंबई उपनगरच्या वरिष्ठ गटातील प्रथम संघनायकांना देखील यानिमित्ताने गौरविण्यात येईल. मुंबईची कबड्डी वाढविण्यासाठी ज्या संघटनांनी सातत्याने स्पर्धा आयोजन केले अशा आर्य सेवा मंडळ, शिवनेरी सेवा मंडळ, अमर क्रीडा मंडळ, दादर यांच्या बरोबरीने मातीची क्रिडांगण बनविणारे, ते क्रिडांगण एका हाती सरळ रेषेत आखणारा अशोक गुरव आदींचा सत्कार होणार आहे.

बोरिवलीमध्ये १७ एप्रिलपासून अजिंक्यतारा मल्लखांब स्पर्धा

■ मुंबई

मल्लखांब लव संघ आणि सुविद्या प्रसारक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने १७ ते १९ एप्रिलदरम्यान सायंकाळी ४ ते रात्री १० या वेळेत बोरीवली पश्चिममधील एक्सर रोड येथील स्कूल ऑफ एन्व्हायरन्मेंट ॲण्ड आर्किटेक्चरमध्ये (एक्सर सुविद्या शाळा) मल्लखांबातील अनभिषिक्त सम्राट कै. दत्ताराम दुदम यांना समर्पित अजिंक्यतारा चषक मल्लखांब स्पर्धा सलग ५ व्या वर्षी आयोजित करण्यात आली. मुंबई उपनगर, मुंबई शहर, ठाणे, पालघर व रायगड जिल्ह्यांतील ५० संस्थांमधून ९०० पेक्षा जास्त खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. ६, ८, १०, १२, १४, १६ आणि १८ वर्षांखालील मुले आणि मुली असे खेळाडूंचे वयोगट आहेत. मल्लखांब खेळातील एकमेव पॅरा मल्लखांब वयोगटातील स्पर्धा देखील यावेळी घेण्यात येणार आहे. सहभागी प्रत्येक खेळाडूस अजिंक्यतारा पदक, सहभाग प्रमाणपत्र व भेटवस्तू देण्यात येईल.

समर व्हॅकेशन क्रिकेट शिल्ड स्पर्धेत केआरपी एकादश संघ विजेता

■ मुंबई

अष्टपैलू मनिषची सर्वोत्तम कामगिरी

एक्सप्लेनेड क्रिकेट क्लबच्या वतीने आयोजित समर व्हॅकेशन क्रिकेट शिल्ड स्पर्धेत केआरपी एकादश संघाने विजेतेपद पटकावले. अंतिम लढतीत केआरपी एकादश संघाने गौड युनियन क्रिकेट क्लबचा सहा विकेटनी पराभव करत विजयी निश्चित केला. गौड युनियन क्रिकेट क्लबचे १३९ धावांचे आव्हान केआरपी क्रिकेट क्लबने १४० धावा करत सहज पार केले. सुरुवातीला योगेश पवारच्या ६५ धावांच्या अर्धशतकी खेळीमुळे गौड युनियन क्रिकेट क्लबने समाधानकारक धावसंख्या उभारली.

केआरपी संघाचा कर्णधार मनिष रावने २५ धावा देत चार फलंदाज बाद केले. उत्तरादाखल समीर भट्टने अर्धशतकी आणि मनीषने फलंदाजीतही छाप पाडताना नाबाद २९ धावा बनवून संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले. अष्टपैलू खेळ करणाऱ्या मनिष रावची स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू व सर्वोत्कृष्ठ गोलंदाज म्हणून निवड करण्यात आली.

लडाखला समान न्याय द्या वांगचूक यांचा पुनरुच्चार

■ कारगिल

लडाखचे पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचूक यांचे काल कारगिलमध्ये उत्साहात स्वागत करण्यात आले.याप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना वांगचूक यांनी लडाखला समान न्याय दिला जावा,तसेच सर्व घटनात्मक अधिकार दिले जावेत,ही मागणी पुन्हा एकदा केली. लडाखमध्ये गेल्या वर्षी झालेल्या हिंसक आंदोलनाला जबाबदार धरून केंद्र सरकारने वांगचूक यांना राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली (रासुका) अटक केली होती. सुमारे सहा महिने जोधपूर कारागृहात बंद असलेल्या वांगचूक यांची यावर्षी १४ मार्च रोजी सुटका करण्यात आली.त्यानंतर पहिल्यांदाच वांगचूक कारगिलमध्ये आले होते.

न्यायाधिशाने लेकीचा घटस्फोट वाजत गाजत साजरा केला

■ लखनौ

आपल्या विवाहित मुलीचा संसार सुखाचा व्हावा अशी तमाम आई-वडिलांची इच्छा असते.

दुर्दैवाने मुलीला पतीपासून घटस्फोट घ्यावा लागला तर ती गोष्ट दुदैवी मानली जाते. मात्र उत्तर प्रदेशमध्ये एका निवृत्त न्यायाधीशाने आपल्या मुलीचा घटस्फोट चक्क ढोल-ताशांसह वाजत -गाजत साजरा केला. ज्ञानेंद्र कुमार शर्मा असे या निवृत्त न्यायाधीशांचे नाव आहे. त्यांची एकुलती एक कन्या प्रणिता वशिष्ठ हिचा घटस्फोटाचा अर्ज न्यायालयाने नुकताच मंजूर केला.त्यानंतर ज्ञानेंद्र कुमार यांनी आपल्या लेकीला वाजत-गाजत घरी आणले.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

प्रणिताचा विवाह १९ डिसेंबर २०१८ रोजी भारतीय सैन्यात मेजर पदावर असलेल्या तरुणाशी झाले होते.

विदेश

पाक कॅबिनेट मंत्र्यांचे वेतन सहा महिन्यांसाठी बंद

■ इस्लामाबाद

आखाती युद्धाच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर वाढलेल्या महागाई आणि आर्थिक संकटाचा फटका पाकिस्तानला बसला आहे. या परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी कठोर निर्णय जाहीर केला आहे. सरकारने पुढील सहा महिन्यांसाठी कॅबिनेट मंत्र्यांचे वेतन बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आर्थिक ताण कमी करण्यासाठी व सरकारी खर्चावर नियंत्रण आणण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. देशाला संबोधित करताना शरीफ यांनी जनतेला दिलासा देण्याचाही प्रयत्न केला. पेट्रोलवरील लेव्ही ८० रुपयांनी कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

अमेरिकेच्या दबावानंतर क्युबाकडून २,००० हून अधिक कैद्यांची सुटका

■ हॅवाना

अमेरिकेकडून वाढत्या राजकीय आणि आर्थिक दबावाच्या पार्श्वभूमीवर क्युबाने २,००० हून अधिक कैद्यांच्या सुटकेचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे क्युबामधील मानवाधिकार आणि अमेरिका-क्युबा संबंध पुन्हा एकदा चर्चेत आले. क्युबा सरकारने मानवतावादी कारणे आणि सार्वभौम निर्णयाचा भाग म्हणून एकूण २,०१० कैद्यांना मुक्त करण्याची घोषणा केली.

या घोषणेनंतर देशातील विविध तुरुंगांमधून कैद्यांना सोडण्याची प्रक्रिया सुरू झाली. पूर्व हॅवानामधील ला लिमा तुरुंगातून पहिल्या टप्प्यात २० हून अधिक कैदी मुक्त करण्यात आले. सुटकेनंतर अनेक कैदी भावनिक झाले होते आणि त्यांनी तुरुंगाबाहेर वाट पाहत असलेल्या आपल्या कुटुंबीयांना मिठी मारली. यामध्ये परदेशी नागरिक, तरुण, महिला तसेच ६० वर्षांवरील ज्येष्ठ कैद्यांचा समावेश आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून मंत्रालयासमोर काँग्रेसविरोधात बॅनर

■ मुंबई

बारामती पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी, अशी अपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात असताना काँग्रेसने उमेदवार दिल्यामुळे नाराजी वाढली आहे. आज राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते रामराव पाटील-चौधरी यांनी मंत्रालयासमोर काँग्रेसविरोधात बॅनर लावले.

या बॅनरवर काँग्रेसच्या भूमिकेवर तीव्र शब्दांत टीका करण्यात आली आहे. आमच्या दादांनी आयुष्यभर काँग्रेसमध्ये काम केले, राष्ट्रवादी स्थापन झाल्यानंतरही काँग्रेसच्या आमदार-कार्यकर्त्यांना साथ दिली. आज मात्र आपणच आमच्याविरोधात उभे राहत आहात, असा सूर या बॅनरमधून व्यक्त करण्यात आला आहे.

सुनेत्रावहिनींना बिनविरोध निवडून दिल्यास आम्ही आयुष्यभर ऋणी राहू, असे आवाहन करत काँग्रेसने उमेदवार मागे घ्यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे.

संयुक्त महाराष्ट्र दालनाची दुरवस्था पेडणेकरांचा पालिकेवर हल्लाबोल

■ मुंबई

संयुक्त महाराष्ट्र लढ्याचा इतिहास जपण्यासाठी उभारण्यात आलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या दादर येथील संयुक्त महाराष्ट्र स्मृती दालनाची सध्या दयनीय अवस्था झाली आहे. आज माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी दालनाच्या पाहणीनंतर त्यांनी आंदोलन करत पालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. 'आंधळ दळतं आणि कुत्रं पीठ खात' अशी पालिकेची अवस्था झाली आहे, अशी टीका त्यांनी केली आहे.

शिवाजी पार्क येथील स्वातंत्र्यवीर सावरकर मार्गावरील या दालनाची उभारणी सुमारे १४ वर्षांपूर्वी करण्यात आली होती. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील हुतात्म्यांचा इतिहास भावी पिढ्यांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने हे स्मृती दालन उभारण्यात आले होते. ३० एप्रिल २०१० रोजी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते या दालनाचे उद्घाटन झाले होते. पूर्णपणे वातानुकूलित असलेल्या या तीन मजली दालनात संयुक्त महाराष्ट्र लढ्याचा इतिहास मांडण्यात आला आहे. सुरुवातीला येथे पर्यटकांची मोठी गर्दी होती.पण कोरोनानंतर हे दालन काही काळ बंद राहिले आणि पुन्हा सुरू झाल्यानंतरही माहितीअभावी नागरिकांचा प्रतिसाद कमी झाला आहे. सध्या दालनात धूळ, माती, बुरशी तसेच कबुतरांचा उपद्रव वाढला असून, पुतळ्यांचीही दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे. काही ठिकाणी संरचनात्मक कामे अपूर्ण राहिल्याने सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. यावरून किशोरी पेडणेकर म्हणाल्या की, महानगरपालिकेचा हजारो कोटींचा अर्थसंकल्प असूनही निधीचा योग्य वापर होत नाही. रस्ते धुणे, सुशोभीकरण यावर खर्च होतो. पण ऐतिहासिक वास्तूंकडे दुर्लक्ष केले जाते. संयुक्त महाराष्ट्र स्मृती दालनाची आजची अवस्था अत्यंत चिंताजनक आहे.

बस्तरमध्ये सोडी केशालूसह ४० जणांचे आत्मसमर्पण

■ बस्तर

पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मीचा टॉप कमांडर सोडी केशालू याच्यासह ४० नक्षलवाद्यांनी आज तेलंगणा पोलिसांसमोर शरणागती पत्करली. केशालू उर्फ मल्ला, हा बस्तरमधील पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मीचा महत्त्वाचा नेता मानला जात होता. तो तेलंगणा-छत्तीसगड सीमाभागात सक्रिय असलेल्या नक्षलवादी बटालियनचा उप-कमांडर म्हणून कार्यरत होता. यापूर्वी बदीसे देवा यानेही शरणागती पत्करली होती.

वसईतील भोंदू ऋषिकेश वैद्यला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

■ मुंबई

स्वतःला महादेवाचा अवतार असल्याचे सांगत एका ३५ वर्षीय महिलेवर अत्याचार केल्याच्या आरोपावरून स्वयंघोषित धर्मगुरू ऋषिकेश वैद्य याला न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्याचे समजताच आरोपी ऋषिकेश वैद्य फरार झाला होता. त्यानंतर पुणे पोलिसांच्या यांच्या विशेष पथकासह मांजरी पोलिसांनी शोधमोहीम राबवत त्याला पिंपरी परिसरातून अटक केली. अटकेनंतर त्याला न्यायालयात हजर करण्यात आले होते. प्राथमिक सुनावणीदरम्यान न्यायालयाने त्याला ६ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली होती. दरम्यान, पुढील चौकशीसाठी पोलिसांनी आणखी ३ दिवसांची पोलीस कोठडी वाढवण्याची मागणी न्यायालयात केली. मात्र न्यायालयाने ही मागणी फेटाळून लावत आरोपीला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली.

नालासोपारा पोलिसांच्या हलगर्जीपणामुळे वृद्धाचा मृत्यू

नालासोपारा पोलिसांचा हलगर्जीपणा वृद्धाच्या जीवावर बेतला. बेपत्ता असलेले ७७ वर्षीय वृद्धाला स्थानिकांनी पोलीस ठाण्यात आणले. मात्र पोलिसांनी असंवेदनशीलता दाखवत कसलीही काळजी न घेतल्याने ते पोलीस ठाण्यातूनही बेपत्ता झाले आणि त्यांचा मृतदेह सापडला. विजय वर्तक (७७) हे वाघोली गावात राहत होते. त्यांना स्मृतीदोषाचा आजार होता. २ एप्रिलला घराबाहेर पडले. त्यांच्या डोक्याला मार लागला होता. त्यांचे कुटुंबीय शोध घेत होते.

मुंब्रा भाषणावरून वाद नितेश राणेंविरोधात तक्रार

■ ठाणे

मुंब्रा येथील हिंदू संमेलनातील वक्तव्यांवरून राज्याचे मंत्री नितेश राणे यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) कडून पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. पक्षाचे ठाणे जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान यांनी नौपाडा पोलीस ठाण्यात लेखी फिर्याद दिली. या तक्रारीनुसार, मुंब्रा येथील कार्यक्रमात नितेश राणे यांनी मुस्लीम समुदायाबाबत आक्षेपार्ह विधाने करून धार्मिक द्वेष पसरवण्याचा प्रयत्न केला. तसेच डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात चिथावणीखोर वक्तव्य केले. या कृतीमुळे संविधानिक मूल्यांचा अवमान झाला आहे.

मनोज प्रधान यांनी सांगितले की, मुंब्रा-कौसा परिसरात हिंदू आणि मुस्लीम समाज अनेक वर्षांपासून शांततेत राहतो. अशा परिस्थितीत बाहेरून येऊन कोणीही तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न करणे अत्यंत धोकादायक आहे. मंत्रिपदाची शपथ घेतल्यावर सर्व समाजांना एकत्र घेऊन काम करण्याची जबाबदारी असते. मात्र त्याविरोधात जाऊन विशिष्ट समाजाविरुद्ध वक्तव्य करणे हा संविधानाचा अपमान आहे.

दिल्ली विधानभवनाची सुरक्षा व्यवस्था भेदली

■ नवी दिल्ली

दिल्ली विधानभवनाच्या सुरक्षेचा प्रश्न आज ऐरणीवर आला. विधान भवनाच्या प्रवेशद्वार क्रमांक २ मधून तोंडाला मास्क लावलेला एक कारचालक लोखंडी गेटला धडक देत आतमध्ये शिरला. शांतपणे गाडीतून उतरला,तिथे उभ्या असलेल्या एका गाडीच्या समोर पुष्पगुच्छ ठेवला आणि पुन्हा गाडीने गेटला धडक देत निघून गेला. आतमध्ये येताना किंवा जाताना त्याला कोणीही अडवले नाही. महत्वाची बाब म्हणजे प्रवेशद्वार क्रमांक २ हे केवळ अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी (व्हीव्हीआयपी) आहे.

या प्रवेशद्वारातून कोणाही सामन्य माणसाला प्रवेश दिला जात नाही.असे असताना दिवसाढवळ्या या इसमाने फिल्मी स्टाईलने गाडीने धडक देत लोखंडी गेड उघडून आतमध्ये शिरला आणि पुन्हा धडक देत निघून गेलाच कसा, हा प्रश्न प्रशासनाला पडला. तातडीने चौकशी करण्यात आली असता संबंधित गाडी ही टाटा सीएरा होती. तिच्या नंबरप्लेटवरून ती गाडी उत्तर प्रदेशमध्ये सरबजीत सिंग याच्या नावे नोंदणी झालेली आहे,अशी माहिती मिळाली. मात्र गाडी सरबजीत सिंहच चालवत होता की अन्य कोणी हे कळू शकले नाही. बॉम्ब शोधक पथकाने घटनास्थळाची पहाणी केली असता काहीही धोकादायक वस्तु आढळली नाही.

दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई
म्युनिसिपल बँक भवन, 245 पी.डि'मेलो रोड, फोर्ट, मुंबई - 400 001.

निविदा सूचना

बँकेकरीता **बाह्य संस्थेमार्फत** कंत्राटी पध्दतीने (Outsource) १२ **शिपाई कर्मचारी** घेण्याकरिता अनुभव असलेल्या संस्थांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा, महाव्यवस्थापक, दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई यांना संबोधित करुन सिलबंद लिफाफ्यामध्ये "TENDER FOR HIRING 12 NUMBER OF PEONS ON CONTRACT BASIS" या नावाने दिनांक १६/०४/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठविणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी व निविदा दस्तऐवज करिता (Documents) डाऊनलोड करण्यासाठी बँकेच्या www.mcb.bank.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०७.०४.२०२६
सही/-
महाव्यवस्थापक

TENDER NOTICE
JANKI AVENUE CHSL
Situated At Near Ravi Raj Residency, Mira-Bhayander Road, Azad Nagar, Bhayander (East) Thane-401105

Sealed Item Rate Tender are Invited for Repair and Painting Work
Tender can be collected from Society Office.
From: 07/04/2026 to 13/04/2026
Between 2.00 Pm To 5.00 Pm
Date of Submission on
14/04/2026 (up to 5.00 PM)
at JANKI AVENUE CHSL Society Office.
(Refer Address from above)
Note: Only Sealed Tender Package will be accepted

STAR ASSOCIATES PMC PVT.LTD.
Vision Yours, Execution Ours.
Office Address - B.O.Shop No.2, Bldg.No.6, A-Wing, Green Park, Near Gokul Village, Mira Road (East)
Tel. Office. 9820818155
Tender Cost Rs. 3,000/-
(Non-Refundable)

जाहीर नोटीस

आमचे पक्षकार **श्रीमती सुधा चिंतामण गोडबोले** यांनी दिलेल्या माहीती व सुचनेनुसार पुढील प्रमाणे जाहीर सुचनेव्दारे कळविण्यात येते की आमचे पक्षकार यांचे तर्फे खाली नमुद केलेल्या परीशिष्ट अ मधील मिळकतीचे मालकी हक्काचे निर्वेधतेबाबत चौकशी करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने सदर मिळकतीबाबत कोणाचेही विक्री आगाऊ विक्री खरेदी - अदलाबदल देवाणघेवाण भाडेपटेटा, पोट भाडेपटटा गहाणखत कुळवहीवाट संमती परवानगी हस्तांतरण धारणाधिकार बोजा कलमुखत्यारपत्राव्दारे हक्क, ताबा परीक्षण - न्यास, सुविधाधिकार मृत्युपत्र बक्षिस लिन वारसा हक्क हिस्सा भेट रस्तवाट अगर हद्दीबाबत अथवा अन्य स्वरूपाचा काही हक्क वाद असेल अथवा अन्य कशाही प्रकारे कोणत्याही प्रकारे, कोणत्याही स्वरूपाचे हितसंबंध अथवा इतर हक्क असलेल्या कींवा असल्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने खाली सही करणार यांजकडे खाली दिलेल्या पत्यावर लेखी स्वरूपात आणि पुराव्याच्या प्रमाणित नक्लांसह सदर मिळकतीमधील आपल्या दाव्याबाबत कींवा हक्काबाबत ही नोटिस प्रसिध्द झालेल्या दिवसांपासुन पुढील १४ दिवसात कळविणे आवश्यक आहे. अन्यथा सदर मिळकतीमधील सर्व हक्क सोडुन दिल्याचे समजण्यात येईल व मिळकतीचे हक्क निर्वेध असल्याबद्दल प्रमाणपत्र देण्यात येईल

परिशिष्ट - १ विषय: मौजे नौपाडा, ता. व जि. ठाणे येथील नगर भुमापन क्रं. ७६५

अ.नु	नगर भुमापन	क्षेत्र
१)	७६५	५२८ चौ.मी.

दिनांक:- ७/४/२०२६
सही/-
ॲड. श्री. राजेश प्र. मुधोळकर
पत्ताः-२०२, २०३ आनंद पॅलेस, टेंबीनाका भवानी चौक, ठाणे

प्रवेश सुरु...प्रवेश सुरु...प्रवेश सुरु
लेट. एन. बी. छाबडा मिलिटरी स्कूल, रायगांव, सातारा.

मिलिटरी स्कूल (को.एज्यु.) सातारा येथे सन २०२६-२७ साठी इयत्ता ५ वी ते १२ वी (इंग्रजी माध्यम) प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.
शासन नियमानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी समाजकल्याण अनुदानाची सोय आहे.
ॲडमिशनसाठी घेण्यात येणारी प्रवेश परीक्षा ही रविवार दि. २६/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० ते दु. २.०० या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. इयत्ता ५ वी ते १२ वी साठी इंग्रजी, गणित व सामान्यज्ञान या विषयांचा प्रवेश परीक्षेमध्ये समावेश असेल. सदर परीक्षेचे नावनोंदणी शुल्क रु. ५००/- भरुन खाली दिलेल्या अकाउंट नंबर वर दि. २३/०४/२०२६ पूर्वी नावनोंदणी करणे बंधनकारक असेल.

Account Details
Name of Bank : Union Bank Of India Branch Satara
A/c Name : N.B.Chhabada Military School
Saving A/C No. : 579302010004089
Amount to be deposited :
Code IFSC : UBINO557935

: संपर्क :
मोबा.: 9881373735, 9822027728
: पत्ता :
सर्व्हे नं. २५९, मु.पो.रायगांव,
ता.जावळी, जि.सातारा. ४१५०२०

बैद इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनात)
सीआयएन: U17100GJ2007PTC050851
नोंदणीकृत पत्ता: प्लॉट क्र.८, जी.आय.डी.सी. पानोली, अंकलेश्वर, गुजरात, भारत - ३८४११६.

नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ अंतर्गत ई-लिलाव विक्री सूचना

नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियमांनुसार, **मे. बैद इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनात)** यांचे यंत्र व सामग्री आणि जमीन व इमारत यांच्या विक्रीसाठी, इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (परिसमापन प्रक्रिया) नियम, २०१६ च्या नियम ३२ आणि ३३ नुसार, याद्वारे सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे. आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियम, २०१६ च्या नियम ३३ अंतर्गत अनुसूची १ नुसार, खालील बाबींसाठी विक्री माझ्याद्वारे https://baanknet.com//login या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे आयोजित केली जाईल:

ब्लॉक	मालमत्ता	तपशिल	आरक्षित मूल्य (रु.)	इरठे रक्कम (रु.)	वाढीव मूल्य (रु.)
ए	जमीन आणि इमारत तसेच संयंत्र आणि यंत्रसामग्री	साईटचा पत्ता: प्लॉट क्र.८, जी.आय.डी.सी. पानोली, अंकलेश्वर, गुजरात, भारत - ३८४११६	19,00,00,000.00	1,90,00,000.00	5,00,000.00
बी	केवळ संयंत्र आणि यंत्रसामग्री	साईटचा पत्ता: प्लॉट क्र.८, जी.आय.डी.सी. पानोली, अंकलेश्वर, गुजरात, भारत - ३८४११६	3,05,00,000.00	30,50,000.00	5,00,000.00
सी	केवळ जमीन आणि इमारत	साईटचा पत्ता: प्लॉट क्र.८, जी.आय.डी.सी. पानोली, अंकलेश्वर, गुजरात, भारत - ३८४११६	15,95,00,000.00	1,59,50,000.00	5,00,000.00

आवश्यक अर्ज, प्रतिज्ञापत्रे, घोषणापत्र इत्यादी बान्कनेट पोर्टलवर सादर करणे	०७.०४.२०२६ ते २०.०४.२०२६
स्थळभेट / तपासणीची तारीख	०७.०४.२०२६ ते २०.०४.२०२६
इरठे सादर करण्याची अंतिम तारीख	२०.०४.२०२६
ई-लिलावाची तारीख आणि वेळ	
ब्लॉक ए-जमीन आणि इमारत, सोबतच संयंत्र आणि यंत्रसामग्री	तारीख: २२.०४.२०२६, वेळ: दु.०१:३० ते ०२:३० (भाप्रवे)
ब्लॉक बी-फक्त संयंत्र आणि यंत्रसामग्री	तारीख: २२.०४.२०२६, वेळ:दु.०३:०० ते ०४:०० (भाप्रवे)
ब्लॉक सी-फक्त जमीन आणि इमारत	तारीख: २२.०४.२०२६, वेळ: दु.०४:३० ते ०५:३० (भाप्रवे)

ई-लिलाव सेवा प्रदाता: बान्कनेट
ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे आहेत:
१. ई-लिलाव **जसे आहे जेथे आहे, ज्या स्वरूपात आहे त्याच स्वरूपात, कोणत्याही दाव्याशिवाय आणि जे काही उपलब्ध आहे त्या आधारावर** मंजूर सेवा प्रदाता, बान्कनेट यांच्यामार्फत आयोजित केला जाईल. ही ई-लिलाव सूचना, मालमत्तेचा तपशील, ई-लिलाव बोली अर्ज, घोषणा आणि हमीपत्रे, ई-लिलाव विक्रीच्या सामान्य अटी व शर्ती यांचा समावेश असलेल्या संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया माहिती दस्तऐवजासोबत वाचली जावी, जो ई-लिलाव सेवा प्रदात्याच्या वेबसाईटवर उपलब्ध करून दिला जाईल.
२. बोली सादर करण्यापूर्वी मालमत्ता आणि तपशिलांची पाहणी करून स्वतःची खात्री करून घेणे ही बोलीदारांची जबाबदारी असेल. लिलावासाठी ठेवलेल्या मालमत्तांची पाहणी करण्यास इच्छुक बोलीदारांना **०७.०४.२०२६ ते २०.०४.२०२६** या कालावधीत संबंधित ठिकाणी परवानगी दिली जाईल.
३. इच्छुक बोलीदाराने ई-लिलावात सहभागासाठीचे विनंती पत्र, केवायसी आणि मालमत्तेचा तपशील, ई-लिलाव बोली अर्ज, घोषणापत्र व हमीपत्रे, ई-लिलाव विक्रीच्या सामान्य अटी व शर्ती आणि इतर आवश्यक कागदपत्रांसह संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया माहिती दस्तऐवज 'बान्कनेट' पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे. ही कागदपत्रे सादर करण्याची अंतिम मुदत **२० एप्रिल, २०२६** आहे.
४. आवश्यक कागदपत्रांचे नमुने बान्कनेट पोर्टलवरील ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवजात उपलब्ध आहेत. आवश्यक अर्ज, प्रतिज्ञापत्रे, घोषणापत्र इत्यादी https://baanknet.com या ई-लिलाव पोर्टलवर सादर करावेत.
५. इरठे हे https://baanknet.com या ई-लिलाव पोर्टलद्वारे जमा करणे आवश्यक आहे. इच्छुक बोलीदारांनी इसारा रक्कम ठेव https://baanknet.com या ई-लिलाव पोर्टलद्वारे जमा करणे आवश्यक आहे, **इरठे सादर करण्याची अंतिम तारीख २० एप्रिल, २०२६** आहे.
६. बोलीदारांना विनंती आहे की, बोली सादर करण्यापूर्वी आणि ई-लिलाव विक्री प्रक्रियेत भाग घेण्यापूर्वी, ई-लिलाव प्रक्रियेच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी https://baanknet.com/ या वेबसाईटला भेट द्यावी.
७. जर ब्लॉक ए चा लिलाव यशस्वीरित्या पार पडला, तर ब्लॉक बी आणि ब्लॉक सी चे लिलाव रद्द केले जातील.
८. जर ब्लॉक ए चा लिलाव यशस्वीरित्या पार पडला नाही, तर ब्लॉक बी चा लिलाव घेतला जाईल.
९. जर ब्लॉक बी चा लिलाव यशस्वीरित्या पार पडला, तरच ब्लॉक सी चा लिलाव घेतला जाईल. जर ब्लॉक बी चा लिलाव यशस्वीरित्या पार पडला नाही, तर ब्लॉक सी चा लिलाव घेतला जाणार नाही.

आयपी जयकिशन राठी, परिसमापक,
बैद इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड – परिसमापनात,
नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P-02710/2022-2023/14166,
पत्ता: ३०४०, ३रा मजला, ट्रेड हाऊस, ऋषभ पेट्रोल पंप जवळ, रिंग रोड, सुरत, गुजरात, ३९५००२., ई-मेल: baid.cirp@gmail.com
दिनांक: ०७.०४.२०२६
ठिकाण: गुजरात

नवी मुंबई महानगरपालिका

शुध्दिपत्रक
मुदतवाढ

नवी मुंबई महानगरपालिकेकडून निविदा सुचना क्र.नमुंमपा / अ.श.अ. / 66/ 2025-26 अन्वये 1. वाशी विभागातील सेक्टर-10 ए येथे उच्चस्तरीय, भुस्तरीय जलकुंभ बांधणे व तद्नुषंगिक कामे करणे.
2. कोपरखैरणे विभागात सेक्टर-23 येथे नविन भुस्तरीय व उच्चस्तरीय जलकुंभ बांधणे व तदअनुषंगिक कामे करणे.
वरील दोन कामांसाठी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर व नमुंमपाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online निविदा मागविण्यात आली होती. तथापि सदरच्या कामासाठी निविदा अर्ज विक्री स्विकारणे व उघडण्याच्या तारखेत खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

अ. क्र.	निविदा सुचना क्रमांक व अनुक्रमांक	निविदा अर्ज विक्रीचा व निविदा स्विकारण्याचा सुधारीत कालावधी	निविदा उघडण्याच्या सुधारीत कालावधी
1	निविदा सुचना क्र.नमुंमपा/अ.श.अ. / 66 / 2025-26	दिनांक 13/04/2026 रोजी 15.00 वाजेपर्यंत	दिनांक15/04/2026 रोजी 16.00 वाजेपर्यंत

सही/-
अतिरिक्त शहर अभियंता
नवी मुंबई महानगरपालिका
जा.क्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/261/2026

व्यावा अपेरेल्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापन अंतर्गत)
(सीआयएन क्र.: U18202MH2012PTC229892)

ई-लिलाव विक्री सूचना

परिसमापक संभाव्य बोलीदारांना, व्यावा अपेरेल्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापन अंतर्गत) (यूटीपीएल/कॉर्पोरेट ऋणको) च्या मालमत्तेचे अधिग्रहण करण्यासाठी **जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे, जसे आहे जे काही आहे आणि कोणत्याही दायित्वाशिवाय, भविष्यात कोणताही दावा/भरपाई न करता** तसेच कोणत्याही प्रकारच्या आश्वासनाशिवाय, हमीशिवाय किंवा वारंटीशिवाय मग ती स्पष्ट असो वा निहित ई-लिलावाद्वारे आमंत्रित करत आहेत. ई-लिलावाबद्दलची महत्त्वाची माहिती खाली नमूद केली आहे:

मालमत्तेचे वर्णन	आरक्षित मूल्य	इसारा रक्कम ठेव	बोली वाढीव रक्कम
संयंत्र आणि यंत्रसामग्री ही वस्त्र शिवणकामासाठी वापरली जाणारी उपकरणे येथे स्थित आहेत: प्लॉट क्र. २, सर्व्हे क्र. १३५ (भाग), सर्व्हे क्र. १३५ (भाग), १६६ए/१ (भाग), डायमंड फूडवे जवळ, मुंबई-आग्रा रोड, आसनगाव, तालुका: शहापूर, जिल्हा: ठाणे - ४२१६०१, महाराष्ट्र.	२,३५,०००/-	२३,५००/-	५,०००/-

अ.क्र.	तपशिल	वर्णन
१.	लिलाव पोर्टल सुरू होण्याची तारीख	०७-०४-२०२६
२.	योग्य तपासणी आणि स्थळभेटीची अंतिम तारीख	२२-०४-२०२६
३.	इरठे सादर करण्याची अंतिम तारीख	२४-०४-२०२६
४.	ई-लिलावाची तारीख आणि वेळ	२७-०४-२०२६
५.	ई-लिलाव पोर्टलची संकेतस्थळ	https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home

इच्छुक बोलीदारांनी एक हमीपत्र (प्रक्रिया मेमोरँडममध्ये जोडलेल्या नमुन्यानुसार) सादर करणे आवश्यक आहे, ज्यामध्ये त्यांनी नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ च्या कलम २९ए अंतर्गत लागू असलेल्या कोणत्याही अपात्रतेस पात्र नसल्याचे नमूद करावे तसेच, कोणत्याही टप्प्यावर ते अपात्र आढळल्यास त्यांनी जमा केलेली इसारा रक्कम ठेव जप्त करण्यात येईल.

ई-लिलावाच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत:
१. ई-लिलाव हा जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे, जसे आहे जे काही आहे, कोणत्याही दायित्वाशिवाय या तत्त्वांवर; इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडियाने अधिकृत केलेल्या ई-लिलाव सेवा पुरवठादार पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेड (https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home) यांच्यामार्फत आयोजित केला जाईल.
२. मालमत्तेचा तपशील, ऑनलाईन ई-लिलाव बोली अर्ज, घोषणा व हमीपत्र, गोपनीयता हमीपत्र, जागेच्या पाहणीसाठीचे प्राधिकार पत्र आणि ऑनलाईन लिलावाच्या सामान्य अटी व शर्ती यांचा समावेश असलेले संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया ज्ञापन https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. कोणत्याही सहाय्यासाठी, बोलीदार +९१ ९८२०३३१२५९ या क्रमांकावर आणि/किंवा support.baanknet@psballaince.com या ईमेलवर संपर्क साधू शकतात.
३. https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home या लिंकवर गेल्यानंतर, बोलीदारांना संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या 'सर्च' पर्यायाचा वापर करून, नमूद केलेल्या कंपनीचा शोध घ्यावा लागेल.
४. ही ई-लिलाव प्रक्रिया 'प्रक्रिया ज्ञापन' मधील पुढील अटी व शर्तींनुसार आणि त्यामध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार पार पाडली जाते. बोलीदारांनी बोलीची कागदपत्रे, लिलावासाठी ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील आणि बोली अर्ज प्राप्त करण्यासाठी सेवा पुरवठादाराच्या https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home या संकेतस्थळाला भेट द्यावी.
५. इच्छुक बोलीदारांनी आपली बोली सादर करण्यापूर्वी, मालमत्तेचे शिर्षक, स्थानिक करांची थकबाकी, वीज आणि पाणी शुल्क, देखभाल शुल्क, असल्यास यांबाबत स्वतःहून स्वतंत्र चौकशी करावी, स्वतःच्या खर्चाने मालमत्तेची प्रत्यक्ष पाहणी करून आपली खात्री करून घ्यावी. वर नमूद केलेल्या मालमत्तांची पाहणी, इच्छुक बोलीदारांना श्रीमती भारती मनोज डागा यांच्याशी +९१ ९८२०३३१२५९ या क्रमांकावर संपर्क साधून करता येईल. **मालमत्ता पाहणीची अंतिम तारीख २२ एप्रिल २०२६ ही आहे.**
६. इच्छुक बोलीदार तपासणीसाठी विनंती करू शकतो; तथापि, कोणत्याही कारणास्तव, लिलाव प्रक्रियेत अर्जदाराने विनंती केली असली तरीही, स्थळ भेट आयोजित न करण्याचा पूर्ण अधिकार परिसमापकाकडे राखीव आहे.
७. इच्छुक बोलीदारांनी https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home या संकेतस्थळावर खरेदीदार म्हणून स्वतःची नोंदणी करून आणि त्यांचे ई-वॉलेट रिचार्ज करून, इसारा रक्कम ठेव (इरठे) जमा करणे आवश्यक आहे. इरठे रक्कम सादर करण्यासाठी, इच्छुक बोलीदाराच्या ई-वॉलेटमध्ये पुरेसा शिल्लक निधी असणे गरजेचे आहे; जेणेकरून, जेव्हा ते लिलावात सहभागी होण्याचा निर्णय घेतील, तेव्हा इरठे रक्कम थेट लिलाव पोर्टलवरच जमा करता येईल. (खरेदीदार नोंदणीबाबतची सविस्तर मार्गदर्शिका 'प्रक्रिया ज्ञापन' सोबत जोडलेली आहे).

अधिक माहितीसाठी +९१ ९८२०३३१२५९ या क्रमांकावर संपर्क साधावा किंवा liquid.vavya@gmail.com या पत्त्यावर ईमेल करावा.

सही/-
भारती मनोज दावडा
व्यावा अपेरेल्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापन अंतर्गत) चे परिसमापक
नोंद. क्र.: IBBI/IPA-001/IP-P-01963/2020-2021/13070
एएफए क्र.एए१/१३०७०/०२/३११२२६/१०८७४६ वैधता ३१.१२.२०२६ पर्यंत
आयबीबीआयसह नोंद.ईमेल आयडी: bharteedaga1008@gmail.com
प्रकल्प विशिष्ट ईमेल आयडी: liquid.vavya@gmail.com
ठिकाण: मुंबई
दिनांक: ०७.०४.२०२६

मध्य रेल्वे
बाह्य ब्रॅकेट

उप-मुख्य सामग्री व्यवस्थापक (सीडब्ल्यूई), सी आणि डब्ल्यू कार्यशाळा, माटुंगा, मुंबई-४०००१९. **निविदा सूचना क्र.: सीडब्ल्यूई/ एमटीएन/८५२५५७७४ बी/२०२६, देय दिनांक: ०१-मे-२०२६. निविदा शीर्षक:** (१) आतील ब्रॅकेट- रेखाचित्र क्र. आयसीएफ/एसके३/३२९६३२५० नुसार = ०४ नग. (२) बाह्य ब्रॅकेट (आरएच) - रेखाचित्र क्र.आयसीएफ/एसके३/३२९६३२४९ नुसार = ०२ नग. (३) बाह्य ब्रॅकेट (एलएच) - रेखाचित्र क्र. आयसीएफ/एसके३/३२९६३२५२ नुसार = ०२ नग. (०८ नग मिळून एक संच). **प्रमाण:** १०३०. **देय दिनांक:** ०१ मे २०२६ **मूल्य:** ६७७९०१५०. AK-17

रेल्वे मार्गाजवळ असुरक्षित आणि अनधिकृत काम करणे हा शिक्षापात्र गुन्हा आहे.

जाहीर सूचना

सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की, सदनिका क्र. बी/३०६ सुंदर धाम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. पत्ता - रामबाग लेन, ऑफ एस. व्ही. रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०००९२ चे सदस्य श्रीमती जाई जितेन कोठारी या आमच्या अशिलांचे मूळ भाग प्रमाणपत्र क्र. ०४२, डिस्टिंक्टिव्ह क्र. २०६ ते २१० (दोन्ही समाविष्ट) हरवले/गहाळ झाले आहे. आमच्या अशिलांनी दुय्यम भाग प्रमाणपत्राकरिता अर्ज करण्यात आला आहे.
आमचे अशील याद्वारे दुय्यम भाग प्रमाणपत्र पारित करण्यास दावेदार/आक्षेपदार किंवा आक्षेपदारांकडून सदर सूचना प्रसिद्धीपासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीमध्ये, दुय्यम भाग प्रमाणपत्र पारित करण्यास त्याच्या/तिच्या/त्यांच्या दावे/आक्षेपांच्या समर्थनार्थ अशा दस्तऐवज आणि इतर पुराव्यांसह दावे आणि आक्षेप निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे आमंत्रित करीत आहेत. जर वरील विहीत कालावधीमध्ये दावे/आक्षेप प्राप्त न झाल्यास, संस्थेच्या उप-विधीमध्ये दिलेल्या पद्धतीने दुय्यम भाग प्रमाणपत्र पारित करण्यास संस्था मुक्त असेल. दावे/आक्षेप, जर असल्यास, प्राप्त झाल्यास संस्थेच्या उप-विधी अंतर्गत दिलेल्या पद्धतीने त्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

सही/- पायल शेठिया ॲण्ड असोसिएट्स
ॲडव्होकेट, उच्च न्यायालय
चेंबरः २२१, तळमजला, रघुलीला मेगा मॉल, पोईसर, कांदिवली (पश्चिम), मुंबई - ४०००६७.
मोबा. क्र. ९८७०२७६२७३.
ई-मेल आयडीः legal.payal@gmail.com
ठिकाणः मुंबई
दिनांकः ०७.०४.२०२६

जाहीर सूचना

तमाम सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, दीक्षित क्रॉस रोड क्र. १, टीपीएस V, सर पी.एम.रोड, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७ येथे स्थित असलेल्या विरेश्वर हाईट्स को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. या संस्थेमधील ८ व्या मजल्यावरील सदनिका क्र. ८०४ मोजमाप ६३१ चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ ही सदनिका सदनिकेचे मालक श्री. शंकर विरेंद्र तिवारी आणि सौ. अनिता शंकर तिवारी यांच्याकडून खरेदी करण्याकरिता आमचे अशील बोलणी करीत आहेत.
निम्न उल्लेखित सदनिकेच्या संदर्भात विक्री, देवाणघेवाण, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, ताबा, वारसा, संप्रेषण, धारणाधिकार, वहिवाट, मृत्युपत्र या मार्गे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध असणाऱ्या, तसा दावा असणाऱ्या कोणीही/ सर्व व्यक्ती आणि/ किंवा वित्तीय संस्था यांनी त्याबाबत लेखी स्वरुपात, दाव्याच्या पृष्ठ्यर्थ सर्व नोंदणीकृत कागदपत्रांच्या नोटरीकृत सत्य प्रतींसह **ॲडव्होकेट, श्री. दिपेश जे. सांचला यांचे कार्यालय क्र. ए-०२, तळमजला, आलोक अपार्टमेन्ट सीएचएसएल, महंत रोड विस्तारित, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७** येथील कार्यालयात या सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या कालावधीमध्ये कळवावे, अन्यथा असे सर्व दावे, हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध जर असल्यास, पुढील कोणत्याही सूचनेशिवाय सोडून दिले आणि/ किंवा माफ केले असे समजण्यात येईल.

मालमत्तेची अनुसूची
दीक्षित क्रॉस रोड क्र. १, टीपीएस V, सर पी. एम.रोड, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७ येथे स्थित असलेल्या विरेश्वर हाईट्स को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. या संस्थेमधील ८ व्या मजल्यावरील सदनिका क्र. ८०४ मोजमाप ६३१ चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ आणि सदर इमारत मुंबई उपनगर जिल्ह्याच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप-जिल्ह्यामधील सुसंगत सीटीएस क्र. १६८८, १६८९, १६९० आणि १६९२ किंवा जवळपास धारण केलेल्या विलेपार्ले नगर नियोजन योजना क्र. V चे अंतिम भूखंड क्र. २५९, २६२, २६३ आणि २६४ धारण केलेल्या, गाव विलेपार्ले पूर्व, तालुका अंधेरी येथे असलेल्या, वसलेल्या आणि स्थित जमिनीच्या प्लॉटवर बांधलेली आहे.

दिनांकः ०७.०४.२०२६
सही/-
(दिपेश जे. सांचला)
वकील

नवाकाळ

Email- contact@navakal.in | www.navakal.in | /navakalofficial

धारावीत आधुनिक कम्युनिटी टॉयलेट ब्लॉक्ससाठी तीन कोटींचा प्रकल्प

■ मुंबई

धारावी परिसरातील स्वच्छता व पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने मुंबई महापालिकेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. जी उत्तर विभाग कार्यालयांतर्गत धारावीत आधुनिक आरसीसी बांधकाम असलेले तळ अधिक एक मजली कम्युनिटी टॉयलेट ब्लॉक्स उभारण्यात येणार आहेत. या प्रकल्पासाठी पालिका तब्बल ३ कोटी ४ लाख ७० हजार रुपये खर्च करणार आहे. धारावी पुनर्विकासाच्या पार्श्वभूमीवर परिसरात नागरिकांना अधिकाधिक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यावर राज्य सरकार आणि मुंबई महापालिका प्रशासनाचे नियोजन असणार आहे. त्याचाच भाग म्हणून हे आधुनिक कम्युनिटी टॉयलेट ब्लॉक्स उभारले जाणार आहेत.

या प्रकल्पात पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र शौचालय व्यवस्था, दिव्यांग नागरिकांसाठी विशेष सुविधा, सुसज्ज विद्युत रोषणाई, स्वच्छ पाणीपुरवठा, तसेच मलनिस्सारण व सांडपाणी व्यवस्थापन यांसारख्या आधुनिक सुविधा उपलब्ध असतील. याशिवाय या टॉयलेट ब्लॉक्सच्या नियमित देखभाल व स्वच्छतेसाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात येणार आहे. या सुविधांमुळे परिसरातील नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि सन्मानजनक शौचालय सुविधा मिळणार असून, सार्वजनिक आरोग्य सुधारण्यास मोठी मदत होणार आहे.

बास्केटबॉलची गोलपोस्ट कोसळून तरुणाचा मृत्यू

■ पुणे

बास्केटबॉल खेळताना गोल करण्याच्या प्रयत्नात गोलपोस्ट कोसळून डोक्याला गंभीर इजा झाल्याने २० वर्षीय विद्यार्थ्याचा दुदैवी मृत्यू झाला.

मावळ तालुक्यातील एका खासगी सागरी प्रशिक्षण देणाऱ्या महाविद्यालयात रविवारी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली, अशी माहिती तळेगाव पोलिसांनी दिली. विशाल वर्मा असे या विद्यार्थ्याचे नाव आहे. मुळाचा उत्तर प्रदेशमधील असलेला विशाल महाविद्यालयाच्या वसतीगृहात राहत होता. नेहमीप्रमाणे विशाल महाविद्यालयाच्या मैदानावर बास्केटबॉल सराव करत होता. त्याच्यासोबत अन्य विद्यार्थीदेखील होते. सरावादरम्यान विशालने उंच उडी मारत गोलपोस्टची लोखंडी रिंग दोन्ही हातांनी पकडली. मात्र त्याच्या वजनाने गोलपोस्ट कोसळून खाली पडली.

कर्जत स्थानकात गाड्या थांबत नसल्याने रेल रोकोचा इशारा

कर्जत रेल्वे पॅसेंजर हक्क समिती आक्रमक

■ कर्जत

कोरोनापूर्वी कर्जत स्थानकावर थांबणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाड्या पुन्हा सुरू करण्यासाठी सनदशीर मार्गाने अनेक प्रयत्न करूनही प्रश्न सुटत नसल्याने आता रेल रोको आंदोलनाशिवाय पर्याय उरलेला नाही, असा इशारा कर्जतकरांनी दिला आहे. कर्जत रेल्वे पॅसेंजर हक्क समितीच्या वतीने प्रवाशांच्या समस्या जाणून घेण्यासाठी श्री शनि मंदिराच्या रविकिरण सभागृहात विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती.

बैठकीच्या सुरुवातीला समितीचे प्रमुख ॲड. कैलास मोरे यांनी बैठकीचा उद्देश स्पष्ट करत उपस्थितांना आपापल्या समस्या मांडण्याचे आवाहन केले. यावेळी समितीचे सदस्य प्रभाकर करंजकर यांनी सांगितले की, गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून रेल्वे प्रवाशांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र अद्यापही प्रश्न सुटत नसल्याने रेल रोको आंदोलन करण्याची वेळ आली आहे. समितीचे सदस्य कीर्ती शहासने यांनी सकाळी ७ वाजताची मुंबईकडे जाणारी लोकल वेळेवर येत नसल्याची तक्रार केली.

भूसंपादन मोबदल्यावरील प्राप्तिकर माफ

केंद्राच्या निर्णयाने शेतकऱ्यांना मोठा दिलासा

■ पालघर

प्रकल्पांसाठी भूसंपादन केलेल्या जमिनीच्या मोबदल्यावर कोणताही प्राप्तिकर लागू न करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. यासंदर्भात रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने परिपत्रक जारी केले आहे. या निर्णयामुळे देशभरातील शेतकरी आणि भूधारकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

पालघर जिल्ह्यात बुलेट ट्रेन, मुंबई-वडोदरा एक्स्प्रेसवे, दिल्ली-अलिबाग कॉरिडॉर, वाढवण बंदर यांसारखे अनेक महत्त्वाचे प्रकल्प सुरू आहेत. या प्रकल्पांसाठी शेतकरी व भूधारकांच्या जमिनी संपादित करण्यात येत आहेत. मात्र, मिळणाऱ्या मोबदल्यावर प्राप्तिकर आकारला जात असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत होता. या पार्श्वभूमीवर पालघरचे खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन हा मुद्दा मांडला होता. त्यांच्या मागणीची दखल घेत मंत्रालयाने परिपत्रक काढून भूसंपादन मोबदला पूर्णपणे प्राप्तिकरातून मुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे.

शिवसमर्थ संस्थेच्या मुख्य कार्यालयात अग्रलेखांचे बादशहा निलकंठ खाडिलकर (भाऊ) यांना अभिवादन...

सोलापुरात भाजपामध्ये गटबाजी

जाहिरातीतून गोरेंचा फोटो गायब

■ सोलापूर

भाजपा स्थापनादिनानिमित्त आमदार विजयकुमार देशमुख यांनी दिलेल्या जाहिरातीतून पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा फोटो वगळण्यात आल्याने सोलापूर भाजपामधील अंतर्गत वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. विशेष म्हणजे या जाहिरातीत शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर आणि जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांचे फोटोही वगळण्यात आले आहेत.

सोलापूर भाजपामध्ये आमदार विजयकुमार देशमुख आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यातील मतभेद यापूर्वीही उघड झाले होते. महापालिका निवडणुकीवेळी आयाराम नेत्यांना उमेदवारी देण्याच्या मुद्यावरून देशमुख आणि सुभाष देशमुख यांनी उघड नाराजी व्यक्त केली होती. बाहेरून आलेल्या नेत्यांना प्राधान्य दिल्यास निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभे राहू, असा इशाराही देशमुखांनी दिला होता. या वादानंतर काही काळ परिस्थिती शांत झाली होती. पण आता जाहिरातीतून वरिष्ठ नेत्यांचे फोटो वगळल्याने पक्षातील अंतर्गत संघर्ष पुन्हा उफाळून आला असल्याचे स्पष्ट झाले आहे.

मुंबईत गुजराती व्यावसायिकाकडून मराठी व्यावसायिकाला मारहाण

■ मुंबई

मुंबईत घाटकोपर पूर्व भागात सार्वजनिक शौचालय वापरण्याच्या वादातून अक्षय भांगरे या मराठी व्यावसायिकाला एका गुजराती व्यावसायिकाने मारहाण केली आहे. घाटकोपर रेल्वे स्थानकाजवळील नालंदा सोसायटी परिसरात ही घटना घडली. मुंबई महापालिकेच्या बाजार विभागाच्या प्रकल्पांतर्गत कार्यालये असून, दुसऱ्या मजल्यावर अक्षय भांगरे यांच्या प्रतीक्षा एजन्सीचे कार्यालय आहे.

अक्षय भांगरे यांनी आरोप केला आहे की, शेजारील गुजराती व्यावसायिक झिन गडा आणि निखिल डोमाडिया हे गेल्या काही काळापासून त्यांना त्रास देत होते. सार्वजनिक शौचालय वापरल्याच्या कारणावरून वाद घालत त्यांनी मारहाण केली. तसेच कार्यालय रिकामे करण्यासाठी दबाव आणला जात असून, महापालिका प्रशासनाचा वापर करून नोटीस लावण्यात आली आहे.

या प्रकरणी पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर केवळ एनसी (नॉन-कॉग्निजेबल) नोंदवण्यात आल्याचा आरोपही भांगरे यांनी केला आहे. या घटनेनंतर मनसे कार्यकर्ते आक्रमक झाले असून, संबंधित व्यावसायिकाच्या कार्यालयाबाहेर आंदोलनाचा इशारा देण्यात आला. कार्यालय बंद असल्याने तोडफोड टळली असली, तरी परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

निर्मल लाईफ स्टाईल्सची १,१७९ कोटींची मालमत्ता ताब्यात घेण्यास कोर्टाची मंजुरी

■ मुंबई

निर्मल लाईफ स्टाईल्स मॉल प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने थकवलेले १ हजार १७९ कोटी वसूल करण्यासाठी कंपनीची स्थावर आणि जंगम मालमत्ता ताब्यात घेण्यास महानगर दंडाधिकारी न्यायालयाने मंजुरी दिली आहे.

महानगर दंडाधिकारी न्यायालयाने आता निर्मल लाईफ स्टाईल्स आणि तिची उपकंपनी असलेल्या निर्मल डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड (एनएलडीपीएल)या कंपनीची मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी ॲड. प्रतिक दीपक सुरती यांची

कोर्ट रिसिव्हर म्हणून नियुक्ती केली आहे.

या मालमत्तेमध्ये एनएलडीपीएलची नाहूरमधील जमीन आणि त्यावर अपूर्ण अवस्थेत असलेल्या मॉलचा समावेश आहे. निर्मल लाईफ स्टाईल्स मॉलने एल अँड टी फायनान्स लिमिटेड या कंपनीकडून २०१७ ते २०१९ या कालावधीत कर्ज घेतले होते. त्याची परतफेड कंपनीने केली नाही. त्यामुळे एल अँड टी कंपनीने २०२३ मध्ये फिनिक्स आर्क कंपनीशी करार करून एनएलडीपीएलची मालमत्ता ताब्यात घेण्याचे हक्क प्रदान केले.

चवदार तळे शताब्दी वर्षानिमित्त १४ ऑक्टोबरपासून समता मार्च

■ पुणे

महाड येथील चवदार तळे आंदोलनाच्या शताब्दी वर्षानिमित्त १४ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबरपर्यंत महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात समता मार्च काढण्यात येणार असल्याची घोषणा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली. या मार्चची सुरुवात सातारा जिल्ह्यातून होणार असून, सांगता पुणे येथे करण्यात येणार आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या राज्य वर्किंग कमिटीची महत्त्वपूर्ण बैठक आज पुणे येथील रेसिडेन्सी क्लबमध्ये पार पडली. या बैठकीत रामदास आठवले यांनी मार्गदर्शन केले, तर अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे होते. बैठकीत पक्षबांधणी, संघटनात्मक बळकटी आणि सामाजिक प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवर आधारित आराखडा तयार करून बदलत्या काळानुसार पक्षाला अद्ययावत ठेवण्याची गरज असल्याचे मत राज्य संघटन सचिव प्रा. शहाजी कांबळे यांनी व्यक्त केले. तसेच अर्थसंकल्पात मागासवर्गीयांसाठी जाहीर केलेला निधी अन्यत्र वळवू नये, यासाठी कर्नाटकच्या धर्तीवर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

पुळकोटीत विनापरवाना झाडांची कत्तल

अभिनेते सयाजी शिंदेंचा प्रशासनावर आरोप

■ सातारा

सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील पुळकोटी गावात पानंद रस्त्याच्या कामादरम्यान रस्त्यालगतची झाडे विनापरवाना तोडल्याचा आरोप झाला आहे. या प्रकरणावर अभिनेते सयाजी शिंदे यांनी थेट प्रशासन आणि स्थानिक यंत्रणेवर निशाणा साधत संताप व्यक्त केला.

पुळकोटी गावात पानंद रस्ता योजनेअंतर्गत रस्त्याचे काम सुरू असताना अनेक झाडांची कत्तल करण्यात आली. मात्र ही झाडे तोडताना संबंधित शेतकऱ्यांना ठेकेदाराने कोणतीही पूर्वसूचना दिलेली नव्हती. तसेच आवश्यक शासकीय परवानगी देखील

घेतली नाही. या प्रकारामुळे शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला. येथील ७० वर्षीय शेतकरी सुनंदा पिंजारी यांच्या शेतातील चिंच, लिंब, पिंपरण आणि चंदन यांसारखी झाडे तोडली. ही झाडे त्यांनी अनेक वर्षे मेहनतीने वाढवली होती. काही ग्रामस्थांनी ठेकेदार, ग्रामसेवक आणि सरपंच यांनी संगनमत करून ही झाडे तोडल्याचा आरोप केला. सयाजी शिंदे म्हणाले की, वन विभागाने केलेल्या पंचनाम्यात ठेकेदाराकडून केवळ काही हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. हा दंड अत्यंत अपुरा असून, अशा गंभीर प्रकारांना तो आळा घालू शकत नाही. जर माणसांच्या जीवितहानीला गंभीर शिक्षा असते, तर झाडांची कत्तल करणाऱ्यांवरही कठोर कायदा असला पाहिजे.

त्र्यंबकेश्वरमध्ये व्हीआयपी दर्शनाच्या नावाखाली लूट! भाविकांचा संताप

■ नाशिक

त्र्यंबकेश्वर मंदिर येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची आर्थिक लूट होत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. १२ ज्योतिर्लिंगांपैकी अत्यंत महत्त्वाच्या या मंदिरात देश-विदेशातून मोठ्या संख्येने भाविक येतात. मात्र, दर्शनासाठी 'व्हीआयपी' मार्गाच्या नावाखाली तीन ते पाच हजार रुपये आकारले जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. भाविकांच्या म्हणण्यानुसार, मंदिर परिसरात दलाल सक्रिय असून, ते थेट दर्शन मिळवून देण्याचे आमिष दाखवत मोठ्या प्रमाणात पैसे उकळत आहेत. साधारण रांगेत उभे राहण्याऐवजी जलद दर्शनासाठी ३ ते ५ हजार रुपये देण्याची मागणी करतात. काही प्रकरणांमध्ये अतिरिक्त रकमेचीही मागणी केली जाते.

काही दिवसांपूर्वी मंदिरातील सुरक्षारक्षकांकडून भाविकांना मारहाण केल्याचा प्रकार झाला होता. याशिवाय अनेक तास रांगेत उभे राहिल्यानंतरही दर्शन न मिळाल्याने भाविक संतप्त होत असून, काही जण बेशुद्ध पडल्याच्या घटनाही झाल्या आहेत.

पुण्यात बाबासाहेबांचे बॅनर उलटे लावले! अमोल मिटकरींचा संताप

■ पुणे

पुणे कॅम्प परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त लावण्यात आलेल्या बॅनरपैकी एक बॅनर उलटा लावण्यात आल्याने राजकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या प्रकारावर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते अमोल मिटकरी यांनी तीव्र संताप व्यक्त करत संबंधितांवर कारवाईची मागणी केली आहे.

मंगळवार १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांची जयंती साजरी होणार असून, त्यानिमित्त शहरात विविध ठिकाणी बॅनर्स लावण्यात आले आहेत. पण कॅम्प परिसरात रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या डिव्हायडरवरील पोलवर लावलेले एक बॅनर उलटे असल्याचे निदर्शनास आले. या प्रकारावर नागरिकांनी आक्षेप घेतला असून, निष्काळजीपणावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

याबाबत अमोल मिटकरी यांनी एक्सवर फोटो आणि व्हिडिओ पोस्ट करत संतप्त प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, पुणे - बारामती प्रवास करताना पुणे कँप परिसरात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बॅनर उलटे लावलेले पाहून वेदना झाल्या.

वाढलेल्या परवाना शुल्काचा फटका पालघर जिल्ह्यात ५६ बार, बीअर शॉप बंद

■ पालघर

मद्य आस्थापनांचे परवाना शुल्क वाढल्याने बार चालकांपुढे आर्थिक संकट उभे राहिले आहे. पालघर जिल्ह्यातील तब्बल ५६ मद्य आस्थापना बंद झाल्या आहेत. परवाना शुल्क भरू न शकल्याने त्यांचा परवाना रद्द करण्यात आला आहे.

पालघर जिल्ह्यात १ हजार २४० मद्य आस्थापना आहेत. त्यात ४३२ बीअर बार (परमिट रुम), ६६८ बीअर शॉप्स, ३९ वाईन शॉप आणि १०१ देशी मद्य विक्रीची दुकाने आहेत. मद्य आस्थापनांना विविध शुल्क भरावे लागते. त्यात परवाना शुल्क, जीएसटी, विक्रीकर, शैक्षणिक कर, अग्निशमन कर, टीडीएस व या सर्वांवर १०

आंबिवली-टिटवाळा दरम्यान सिग्नलमध्ये बिघाड

मुंबई - मध्य रेल्वे मार्गावरील आंबिवली-टिटवाळा दरम्यान सिग्नलमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने आज दुपारनंतर लोकल सेवा विस्कळीत झाली. दुपारी सुमारे ३.३५ वाजता हा बिघाड झाला. या बिघाडाचा परिणाम म्हणून कसाऱ्याकडे जाणाऱ्या गाड्या उशिराने धावत होत्या. दुपारी ४.१४ वाजताची कसारा लोकल कल्याण स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर अर्ध्या तासाहून अधिक काळ उभी होती. यामुळे कल्याणहून पुढे जाणाऱ्या अनेक गाड्यांमध्ये विलंब झाला.

दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्रात संगीत नाट्य महोत्सव

■ मुंबई

संगीत नाटकांची परंपरा कायम ठेवण्याच्या प्रयत्नाचा भाग म्हणून दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्राच्या वतीने १० ते १२ एप्रिल या कालावधीत तीन दिवसांच्या संगीत नाट्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेच्या वा. वा. गोखले सभागृहात या नाटकांचे दररोज सायंकाळी ५.३० वाजता सादरीकरण होईल. शुक्रवार १० एप्रिल या दिवशी 'संगीत शांतीब्रह्म' हे खल्वायन, रत्नागिरी निर्मित, आणि डॉ. श्रीकृष्ण जोशी लिखित, मनोहर जोशी दिग्दर्शित नाटक सादर होईल. संगीत दिग्दर्शन विजय रानडे यांचे आहे तर तबल्यावरील साथ हेरंब जोगळेकर करतील. यात स्मिता करंदीकर, श्रीनिवास जोशी, श्रीकांत भाटवडेकर, मंदार गोखले हे कलाकार कला सादर करतील. शनिवार ११ एप्रिल या दिवशी 'संगीत स्वरसम्राज्ञी' हे परस्पर सहाय्यक मंडळ, वाघांबे निर्मित आणि कै. विद्याधर गोखले लिखित, घनःश्याम जोशी दिग्दर्शित नाटक सादर होईल. संगीत कै. नीळकंठ अभ्यंकर यांचे तर संगीत दिग्दर्शन विशारद गुरव यांचे आहे. यात देवश्री शहाणे, विपुल निमकर, राधा टिकेकर, ओमकार मोघे, गुरुप्रसाद आचार्य, वल्लरी मोघे, विरेंद्र जोशी, सर्वेश निमकर, प्रशांत आचार्य यांनी अभिनय केला आहे.

घोडा व ई-रिक्षा वादामुळे माथेरानची विकासकामे रखडली

■ माथेरान

माथेरान नगरपरिषदेच्या निवडणुकीत शिंदेसेना -भाजपा युतीला मिळालेल्या विजयानंतर शहराच्या विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र, सध्या घोडा आणि ई-रिक्षा संघटनांमधील वादामुळे प्रशासनाचा मोठा वेळ या प्रश्नावर खर्च होत असल्याने विकासकामे रखडल्याची खंत स्थानिक लोकप्रतिनिधींनी व्यक्त केली.

या संदर्भात कर्जत येथे शिंदेसेनेचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत माथेरानमधील नगरसेवक, नगरसेविका आणि प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. या बैठकीत नगरसेविका रिजवाना शेख, ऐश्वर्या शिंदे, लता ढेबे, सुरेखा साळुंखे, कमल गायकवाड, अर्चना भिलारे तसेच महिला आघाडीच्या प्रमुख संगीता जांभळे यांनी त्यांच्या प्रभागांतील समस्या मांडल्या. रस्त्यांची दुरवस्था आणि इतर मूलभूत कामे प्रलंबित असल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

पुढील १५ दिवस पाऊस नाही! काढणीसाठी अनुकूल वातावरण

पंजाब डख यांचा सल्ला

राज्यात पुढील सुमारे १५ दिवस पाऊस नसल्याने शेतकऱ्यांना काढणी-वाळवणीसाठी अनुकूल वातावरण असल्याचा अंदाज पंजाब डख यांनी व्यक्त केला. पुढील काळात तापमानात वाढ होण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी या काळात शेती कामांचे योग्य नियोजन करून काढणी आणि साठवणीला गती देण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

■ मुंबई

पंजाब डख म्हणाले की, राज्यात आजपासून उष्णतेचा कडाका वाढण्याचा अंदाज आहे. तापमान ३७ ते ४२ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी काढणीची कामे गतीने पूर्ण करावी. राज्यातील बहुतांश भागात कोरडे वातावरण राहणार आहे. त्यामुळे हा कालावधी कांदा, हळद, गहू, भुईमूग यांसारख्या पिकांची काढणी आणि वाळवणीसाठी अनुकूल परिस्थिती आहे. शेतकऱ्यांनी उपलब्ध हवामानाचा फायदा घेत काढणी व साठवण प्रक्रियेचे नियोजन करावे. उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे, नाशिक, जळगाव आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांमध्ये आज काही ठिकाणी ढगाळ वातावरण होते. मात्र पुढील दिवसांत उष्णतेचा प्रभाव वाढणार आहे. त्यामुळे कांदा काढणीसाठी ही योग्य वेळ आहे. मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, बीड, जालना आणि संभाजीनगर जिल्ह्यांमध्येही उष्णतेचा पारा चढणार आहे.

मोहन भागवत लग्न करून मुले जन्माला का घालत नाहीत?

■ बरेली

संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी यापूर्वी अनेकदा लोकसंख्या वाढीसंदर्भात केलेल्या वक्तव्यावर स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी थेट टीका केली. लोकसंख्या वाढवण्याचा सल्ला देणारे स्वतः लग्न करून मुले जन्माला का घालत नाहीत? असा सवाल त्यांनी केला.

बरेली येथे बोलताना स्वामी अविमुक्तेश्वरानंद म्हणाले की, एकीकडे सरकार लोकसंख्या नियंत्रणाबाबत चिंता व्यक्त करत असताना दुसरीकडे काही नेते लोकसंख्या वाढवण्याचा सल्ला देतात, ही विसंगती आहे.

पश्चिम रेल्वे

दुरुस्ती काम

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए), पश्चिम रेल्वे, ६ वा मजला, अभि. विभाग, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८ आमंत्रित करीत आहेत निविदा सूचना क्र. बीसीटी/२६-२७/५ दिनांक ०२.०४.२०२६. काम आणि ठिकाण: वडाळा रेल्वे कॉलनी:- दैनंदिन तत्त्वावर ७३० दिवसांच्या कालावधीकरिता आवश्यकतेनुसार दुरुस्ती. कामाची अंदाजित किंमत: ₹ १,०२,३३,७२६.७८ ईएमडी: ₹ २,०४,७००/- सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: दि. २८.०४.२०२६ रोजी, १५.०० वा. पर्यंत. उघडण्याचा दिनांक आणि वेळ: दि. २८.०४.२०२६ रोजी १५.३० वाजता. अधिक तपशिलाकरिता कृपया आमची वेबसाईट www.ireps.gov.in येथे भेट द्यावी. 1286

आम्हाला फॉलो करा: X.com/WesternRly

नवाकाळ शब्दकोडे-१५६८



आडवे शब्द –

१. सखोल चौकशी, मागोवा, धांडोळा, विश्वास पाटील यांच्या धरणग्रस्तांच्या जीवनावरील गाजलेल्या कादंबरीचे शीर्षक ४. पण, निश्चय ६. कळसूत्री बाहूली ८. बारा डझन १०. मुलगी, तनया ११. पाहुणा १२. अतिशय हौस १४. थोड्या वेळापूर्वी १६. बोकड १८. बावळट माणूस २०. अपक्व २१. अनुज्ञा, अनुमती २३. हरलेला, नावापुरता उरलेला २६. हर्ष २७. पोपट, दळलेली हळद २८. मारला गेलेला २९. नीड, पक्ष्याचे घर ३१. अविचारी ३२. चैत्रात केले जाणारे कैरीचे घरगुती शीतपेय ३३. कसदार ३५. परभारे ३६. ऐतिहासिक कहाण्यांमधील घोडागाडी ३७. महिला ३८. जहागिरी, इनामी जमीन ३९. तल्लीन ४०. मृतदेह ४२. वातावरणातील प्रमुख घटक ४६. चुट्टा ४८. 'रात्रीस खेळ चाले, या गूढ चांदण्यांचा...' ('हा खेळ सावल्यांचा' मधील गाजलेले गीत) ५०. प्रमाणाबाहेर ५१. दुःख ५२. शस्त्राचा घाव ५३. वाईट सवय ५५. उठाव ५६. महादेवाचा पुजारी ५८. अग्नीचा नैवेद्य ५९. पावलोपावली, सतत ६१. उत्साह ६३. विश्वासघात ६५. ऊन ६६. टोणगा ६८. अहंकार ६९. ढाक्याचे प्रसिद्ध कापड ७१. रामनवमीचा प्रसाद ७३. एक रक्तशोषक कीटक ७४. प्रथा ७६. तृण, चारा ७७. बंदिवान ७८. वर्ष, संवत्सर ७९. 'शेळी जाते जिवानिशी, खाणारा म्हणतो ×××' - केल्याची किंमत नसते या अर्थी म्हण ८२. पाषाण ८३. जहाल विष ८४. तीव्र उष्णतेचा त्रास ८५. वस्ती ८७. उणेदुणे, त्रुटी काढणे- ×× काढणे ८८. गुरांना एकत्र बांधण्याचा दोर ९०. डावा ९२. मोठा पतंग, अफवा ९४. चिंतन ९६. ऐकू न येणारा ९७. मुस्लिमांचा सण ९८. जहाज ९९. दमणूक, शीण

उभे शब्द –

१. 'फिटे अंधाराचे जाळे....' २. टपाल ३. उतरती कळा, ऱ्हास ४. विरोध ५. पंधरवड्यातील पंधरावा अंश ६. कौशल्य ७. खालचा भाग, बूड ९. सगळीकडे १३. रुष्टता, नाराजी १५. जुगारात हरल्यावर पांडवांना भोगावा लागलेला १७. कापडी तंबू १७अ. सीतापती १८. मेंढा १९. सावली, कृपाछत्र २१. रस्त्यावर पादचाऱ्यांसाठी राखून ठेवलेली जागा २२. हलणारा वायू २४. रात्रीची आरती २५. सफाईदारपणा, कौशल्य २८. खेळीमेळीने २९. हरकाम्या नोकर ३०. आधार ३४. मिठी ३६. मार्गस्थ ४१. चैत्रातला ऋतू ४२. गाजराचे मिष्टान्न ४३. सुन्न ४४. व्यास ऋषींचे महाकाव्य ४५. ओळ, रांग ४६. विचारांची देवाणघेवाण, चर्चा ४७. अधोगती झालेला ४९. दरवाजा ५०. हळूवारपणे ५१. निर्धन ५४. आपसातल्या हाणामाऱ्या ५५. मनाई ५७. जंबूक ५९. अब्रू ६०. बेलगाम गर्दी ६१. उरलेले, बाकीचे ६२. ताकीद ६४. वाहन ६५. आदेश, हुकूम ६६. महिषी ६७. पक्ष्यांची किलबिल ७०. मीठ ७२. घरातील ज्येष्ठ माणूस ७५. पूर्वज ७७. भगवान शंकराचे निवासस्थान ७८. प्रारब्धदेवता ७९. प्रशंसा ८०. मतभेद नसलेला ८१. हलके सिंचन ८२. शिकार करणारा ८६. शरीर ८९. उसाचा आटवलेला रस ९१. माज ९३. तमाशा ९५. नाकातला दागिना •

नवाकाळ कोडे क्रमांक १५६७ चे उत्तर

आडवे शब्द : १. पाठिंबा ४. वहिनी ८. उदार १०. वडिलोपार्जित ११. सुधीर मोघे १५. राऊळ १६. पदरव १७. राघोबादादा १८. टवटवी २१. कासव २३. दिल्ली २४. दर २५. जनमानस २७. पत २८. वन २९. आरव ३०. जायबंदी ३२. सलोखा ३३. खराब ३४. आक्रमण ३६. समज ३८. रत ४०. धाम ४१. कालवाकालव ४२. टक्के ४३. पवनार ४६. राणी ४७. गरबा ४८. सुमार ४९. गवई ५१. तेव्हा ५२. जग ५४. झोक ५५. झीट ५७. पणती ५९. मावळती ६०. वचपा ६२. नरमाई ६३. पितर ६५. रूबाई ६६. जाते ६८. महिना ७०. कदान्न ७२. माजी ७४. राघू ७५. साल ७६. सकस ७८. अंग ७९. हलकाफुलका ८१. दलदल ८२. रोजगार ८३. जम ८५. पुरा ८६. दाणेदार ८७. बाक ८८. झळ ९१. अकस्मात ९२. तुरळक ९३. कातरवेळ

उभे शब्द : १. पाहे रात्रंदिवस वाट तुझी २. बावळट ३. किलोमीटर ४. वर्जित ५. हित ६. अधीर ७. सुमो ९. दादाबाबा ११. सुदर्शनचक्र १२. रवका १३. घेराव १४. पादाक्रांत १९. वदन २०. पुनव २२. समय २५. जरब २६. मंदी २७. परिमल २८. वखार २९. आराधना ३०. जाण ३१. बंडलबाज ३४. आमराई ३५. मत्त ३६. सकाळ ३७. जवळीक ३९. तपमापक ४१. कार ४४. वरण ४५. रग ४७. गव्हाळ ५०. वरमाई ५१. तेवढे ५३. गवत ५४. झोपा ५६. टर्रेबाजी ५८. तीन तेरा वाजणे ६१. चरक ६३. पिनाक ६४. खिन्न ६५. रूमाली रोटी ६७. अलका ६९. हिसका ७१. दामोदर ७३. डोंगर ७५. सालस ७७. सदरा ७८. अंगारक ८०. फुटकळ ८४. मदार ८५. पुळका ८६. दात ८७. बार ८९. पोर ९०. भेळ

शरद पवार, ज्योती वाघमारेंची राज्यसभा सदस्यत्वाची शपथ

» पान १ वरून - दिलीप कुमार राय (अपक्ष) यांचाही आज शपथविधी झाला. तर नितीशकुमार हे १० एप्रिल रोजी राज्यसभेचे सदस्य म्हणून शपथ घेणार असल्याची माहिती आहे. शपथविधीनंतर खा. ज्योती वाघमारे म्हणाल्या की, मला मराठी बाणा आणि संस्कृती राज्यसभेत दाखवायची होती. आज मी ज्या पद्धतीने साडी नेसली आहे तशी साडी महाराष्ट्रात शेतात काम करणाऱ्या बायका नेसतात. अशीच साडी सावित्रीबाई फुले आणि रमाई आंबेडकर नेसायच्या, अशीच नथ माता जिजाऊ परिधान करायच्या, कपाळावरचे आडवे कुंकू सावित्रीमाईंची आठवण करून देणारे आहे. कारण त्यांच्या आडव्या कुंकवाने अज्ञानाला आडवे केले. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान आणि शिवरायांचा स्वराज्याचा विचार घेऊन मी आज संसदेपर्यंत पोहचले आहे.

उधार परत न केल्याने मारहाण आदिवासी कामगाराची आत्महत्या

■ वसई

उधार घेतलेल्या ४ हजार रुपयांसाठी छळ करण्यात आल्याने आदिवासी कामगाराने आत्महत्या केल्याची घटना वसईत घडली. याप्रकरणी वसई पोलिसांनी मालकाविरोधात गुन्हा दाखल केला. गणेश वरखडे (५०) हा वसईतील पापडी येथील ओळंबवाडी परिसरात राहत होते. तो मॅलन डिसोजा याच्या चायनीज पदार्थ विक्रीच्या हातगाडीवर काम करत होता. त्याला दररोज २०० रुपये मजुरी मिळत होती. वरखडे याने मालकाकडून ४ हजार रुपये उसने घेतले होते. मात्र, आर्थिक अडचणींमुळे तो पैसे परत करू शकला नव्हता. त्यामुळे मालक पैसे मागेल या भीतीने तो काही दिवसांपासून कामावरही जात नव्हता. काल दुपारी आरोपी मॅलन डिसोजा हा वरखडे याच्या घरी गेला. त्याने उधारीच्या पैशांवरून शिवीगाळ करत त्याला मारहाण केली.

अंजली दमानियांनी भोंदू अशोक खरातच्या सीडीआर प्रकरणी होणारे आरोप फेटाळले

» पान ८ वरून

आठ कॉल आहेत, अंधारेंनी त्याचे तपशील का मागितले नाही? मी जेव्हा शोधले तेव्हा रुपाली चाकणकरांचे पान भरून फोन कॉल आहेत, सुनील तटकरेंचे फोन कॉल आहेत. सगळी माहिती तपशीलवार येते. १ एप्रिल २०२५ ते १७ मार्च २०२६ या कालावधीतील हे कॉल आहेत. मी फक्त माझ्याकडे आलेली माहिती दिली. माझा राग या गोष्टीवर आहे की या सगळे राजकारणी अशा भोंदू लोकांना प्रोटेक्ट करतात. त्यांना विचारले पाहिजे की तुम्ही एवढे कॉल त्याला का केले?

त्या पुढे म्हणाल्या की, समता नावाची पतसंस्था आहे. त्यात पैसे टाकले किंवा काढले की एसएमएस येतो. त्याचे पूर्ण वेळात १ एप्रिल २०२५ ते १७ मार्च २०२६ कधी एक मेसेज यायचा, कधी महिन्याचे ७ मेसेज यायचे. असे मी पूर्ण काढले. पण त्यात २७ जानेवारी म्हणजे अजित पवारांच्या निधनाच्या एक दिवस आधी, १७ मेसेज होते. २८ जानेवारी म्हणजे ज्या दिवशी अपघात घडला त्या दिवशीचे १९ मेसेज आहेत. २९ जानेवारी - १० मेसेज. ३० जानेवारी ८ मेसेज, ३१ जानेवारी - ८ मेसेज. हे दिवसाचे आहेत. म्हणजे यात काय झाले, हे एसआयटीकडे नेऊन तपासाची मागणी करणार आहे.

दमानियांची चौकशी करा अंधारे यांचा हल्लाबोल

अंजली दमानिया यांनी जाहीर केलेल्या कॉल रेकॉर्डवरून उबाठा उपनेत्या सुषमा अंधारे यांनी आक्रमक भूमिका घेत दमानियांवरच चौकशीची मागणी केली आहे. आज पत्रकार परिषदेत बोलताना अंधारे म्हणाल्या की, खासगी व्यक्तीकडे इतक्या संवेदनशील कॉल रेकॉर्ड्स कसे येतात? हा गोपनीयतेचा गंभीर भंग असून, याची चौकशी झालीच पाहिजे. त्यांनी एसआयटीपेक्षा दमानियांचाच तपास भारी आहे, त्यांनाच एसआयटीचे प्रमुख करा. दमानिया यांनी हे रेकॉर्ड एआय ॲपच्या माध्यमातून मिळाल्याचे सांगितले होते. यावर आक्षेप घेत अंधारे म्हणाल्या की, रुपाली चाकणकर यांनी खरातला १७७ वेळा, तर त्यांच्या बहिणीने २३६ वेळा फोन केल्याचे सांगितले जाते. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १६ वेळा आणि मंत्री दीपक केसरकर यांनीही संवाद साधल्याचा दावा आहे. हा सर्व तपशील दमानियांकडे आला कुठून? एखादी खासगी व्यक्ती इतक्या सहजपणे कॉल डिटेल रेकॉर्ड मिळवू शकत असेल, तर हा देशाच्या सुरक्षेशी संबंधित गंभीर प्रश्न आहे. ज्यांनी हे रेकॉर्ड्स पुरवले त्यांच्यावर कारवाई व्हायलाच हवी. तसेच ज्यांची नावे समोर आली, त्यांच्याबाबत काय भूमिका घेणार?

रेल्वेचा ९५ टक्के वक्तशीरपणाचा दावा प्रवासी उशिराच्या तक्रारींनी हैराण

» पान १ वरून

तात्पुरता परिणाम होत असल्याचे सांगत लवकरच ९८ टक्के वक्तशीरपणा गाठण्याचे उद्दिष्ट असल्याचे स्पष्ट केले. तर मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक प्रतीक गोस्वामी यांनी देखभाल कामे आणि 'कवच' सुरक्षा प्रणालीसारख्या प्रकल्पांमुळे सुधारणा होत असल्याचे नमूद केले. दोन्ही रेल्वे प्रशासनांनी विलंबाबद्दल खेद व्यक्त करत सेवा सुधारण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचेही स्पष्ट केले. दरम्यान, उपनगरीय प्रवासी महासंघाचे सरचिटणीस जितेंद्र विशे म्हणाले की, मध्य रेल्वे ९० टक्के वक्तशीरपणाला उत्तम मानते. पण प्रवासी १०० टक्के भाडे भरतात. जर गाडी उशिरा येत असेल तर प्रवाशांनी फक्त ९० टक्के भाडे भरावे का? तर डबेवाला संघटना अध्यक्ष सुभाष तळेकर म्हणाले की, मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या गाड्या ज्या वेळेवर धावत नाहीत हे वास्तव आहे. प्रवाशांना या विलंबाची इतकी सवय झाली आहे की, आता ते त्यावर प्रतिक्रियाही देत नाहीत.

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, आमचे अशील याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेल्या आणि **"सदर मालमत्ता"** असे उल्लेखित टेक्स सेंटर प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि.मधील तळमजल्यावरील युनिट क्र. एल१, एल२ आणि एल३ धारण केलेली वाणिज्य जागा व त्यासह आठ कार पार्किंग जागा आणि तीन दुचाकी पार्किंग क्र. पुढील बाजूस २४०, २४१ आणि २४२ आणि मागच्या बाजूस ५१, ५२, १०८ए, १०९ए आणि ११० ए च्या संदर्भात संयुक्त मालक **जितेंद्र हकाराम चौधरी, सौ. सुनिता जितेंद्र चौधरी आणि श्री. भुपल जितेंद्र कुमार चौधरी** यांच्या शीर्षकाची तपासणी करीत आहेत. सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात विक्री, हस्तांतरण, देवाणघेवाण, अभिहस्तांकन, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, वारसा, उत्तराधिकार, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, लिव्ह ॲण्ड लायसन्स, धारणाधिकार, देखभाल, वहिवाट, ताबा, भाडेकरू, पोट-भाडेकरू, जप्ती, प्रलंबित कायदेशीर कारवाई, हुकूम, आदेश, मनाई हुकूम, सूचना, संपादन, मागणी किंवा करारपत्र, कायद्याचे प्रचालन, वारसा, किंवा अन्यथा कोणत्याही स्वरुपाचा बोजा या मार्गे कोणताही दावा, हक्क, शीर्षक, इस्टेट किंवा हितसंबंध असणाऱ्या सर्व व्यक्तींना याद्वारे विनंती करण्यात येते की, त्याबाबत कागदोपत्री पुराव्याच्या प्रमाणित सत्य प्रतिंसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना त्यांच्या ७०७, ७वा मजला, बी विंग, वूहविंड को-ऑप. हौ. सोसा. लि., वजन काट्याजवळ, कार्डिनल गेशियस रोड, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९९ येथील कार्यालयात, येथील दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करावे, असे न केल्यास, असे समजण्यात येईल की, सदर जितेंद्र हकाराम चौधरी, सौ. सुनिता जितेंद्र चौधरी आणि श्री. भुपल जितेंद्र कुमार चौधरी हे सदर मालमत्तेचे संपूर्ण मालक आहेत आणि सदर मालमत्ता सर्व बोज्यांपासून मुक्त आहे आणि अशा दाव्याच्या, जर असल्यास, कोणत्याही संदर्भाशिवाय शीर्षकाच्या तपासणीचे प्रकरण पूर्ण करण्यात येईल आणि ते सोडून दिले असे मानण्यात येईल आणि असे कोणतेही कथित दावे जर नंतर केल्यास, आमच्या अशिलांवर बंधनकारक नसतील आणि प्रस्तावित व्यवहार सदर मालमत्तेमधील अशा कोणत्याही कथित दावा किंवा हितसंबंधांच्या कोणत्याही माहिती किंवा संदर्भाशिवाय पूर्ण करण्यात येईल.

वरील उल्लेखित अनुसूची

मालमत्तेचे वर्णन

(i) औद्योगिक युनिटः- मुंबईच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप-जिल्ह्यामधील गाव साकी, तालुका कुर्ला येथे स्थित, वसलेल्या आणि असलेल्या सीटीएस क्र. १४/ए धारण केलेल्या जमिनीवर बांधलेल्या, २६-ए, चांदिवली रोड, ऑफ साकी विहार रोड, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००७२ येथे स्थित टेक्स सेंटर प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. या इमारतीच्या विंग "एल" मधील तळमजल्यावर स्थित युनिट क्र. एल-१, एल-२, एल-३ मोजमाप ८५.८२, ११२.४९, ११२.४९ चौ.मी. बिल्ट-अप क्षेत्रफळ किंवा साधारण तेवढेच;

(ii) कार पार्किंग जागाः- टेक्स सेंटर प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. या इमारतीच्या आठ कार पार्किंग जागा आणि तीन दुचाकी पार्किंग क्र. पुढील बाजूस २४०, २४१ आणि २४२ आणि मागच्या बाजूस ५१, ५२, १०८ए, १०९ए आणि ११० ए.

(iii) समभागः टेक्स सेंटर प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडद्वारे पारित विंग "एल" मधील युनिट क्र. १, २ आणि ३ करिता भाग प्रमाणपत्र क्र. ०३६ मध्ये समाविष्ट डिस्टिंक्टिव्ह क्र. २७१ ते २८० (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५०/- प्रत्येकीचे १० पूर्णतः भरणा केलेले समभाग.

दिनांक ७ एप्रिल, २०२६

इच्छुक खरेदीदारांकरिता ॲडव्होकेट धर्मिष्ठा भंदवा

७०७, ७वा मजला, बी विंग, वूहविंड को-ऑप. हौ. सोसा. लि., कार्डिनल गेशियस रोड, वजन काट्याजवळ, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९९.

दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई

म्युनिसिपल बँक भवन, 245 पी.डि'मेलो रोड, फोर्ट, मुंबई - 400 001.

निविदा सूचना

दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई यांच्या सन २०२६ साठी निवृत्त सभासदांना सन्मानचिन्ह देण्याकरीता निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा महाव्यवस्थापक, दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई संबोधित करुन सिलबंद लिफाफ्यामध्ये **"Tender for Supply of Memento (As per Bank sample)"** या नावाने शनिवार, दिनांक १८.०४.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठविणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी व निविदा दस्तऐवज (Documents) डाऊनलोड करण्यासाठी बँकेच्या www.mcb.bank.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.

ठिकाण : मुंबई सही/-
दिनांक : ०७.०४.२०२६ महाव्यवस्थापक

दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई

म्युनिसिपल बँक भवन, 245 पी.डि'मेलो रोड, फोर्ट, मुंबई - 400 001.

निविदा सूचना

दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई सन २०२६ करीता ट्रॉली बॅगेकरीता निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा, महाव्यवस्थापक, दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई यांना संबोधित करुन सिलबंद लिफाफ्यामध्ये **"Tender for Trolley Bag" (as per sample)** या नावाने शनिवार दिनांक १८.०४.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठविणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी व निविदा दस्तऐवज (Documents) डाऊनलोड करण्यासाठी बँकेच्या www.mcb.bank.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.

ठिकाण : मुंबई सही/-
दिनांक : ०७.०४.२०२६ महाव्यवस्थापक

मराविमं सूत्रधारी कंपनी मर्यादित

ई-निविदा सुचना

मुख्य अभियंता (स्था), एमएसईबीएचसीएल, मुंबई ई- निविदा क्र. CEC/MSEBHCL/ MUM/TECH/T-02-2026-27 ला आमंत्रित करत आहेत. बिड कागदपत्रे ०७.०४.२०२६ पासून वेबसाइटवर उपलब्ध होतील. अधिक तपशीलासाठी आणि अद्यतनांसाठी आमच्या वेबसाइट www.mahadiscom.in, ई-निविदा दुव्यास https://etender.mahadis.com.in ला भेट दया. फोन नं. ०२२-२२६०८३८३

HO PR No.83/26-27 dt.06.04.26 मुख्य अभियंता (स्थापत्य)

महावितरण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

ई-निविदा

सासवड विभागातील पायाभूत विकास योजना पुढील कामासाठी नामांकित नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार यांचेकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

अ.क्र.	निविदा क्र.	विभाग	कामाचे नाव
१	टि-०१/ २०२६-२७	सासवड	लघुदाब वाहीनी प्रिव्हेंटीव देखभाल व दुरूस्ती
२	टि-०२/ २०२६-२७	सासवड	उच्चदाब वाहीनी प्रिव्हेंटीवदेखभाल व दुरूस्ती
३	टि-०३/ २०२६-२७	सासवड	रोहित्र प्रिव्हेंटीव देखभाल व दुरूस्ती

कोरी निविदा संच महावितरणचे संकेत स्थळावर दि ०७.०४..२०२६ ते १३.०४.२०२६ पर्यंत डाऊनलोड करण्यास उपलब्ध राहिल. सदर निविदा शुल्क ऑनलाईन पद्धतीनेच भरणे आवश्यक आहे. कोणतेही कारण न देता कोणतीही अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकाराने स्वतःकडे राखून ठेवला आहे. अधिक माहितीसाठी व वेळोवेळी होणाऱ्या बदलांसाठी कंपनीचे https://etender.mahadiscom.in/eatApp. संकेतस्थळ नियमीत पहावे.

सी पी आर ओ क्र.-CPRO/HO/86 /2026-27

कार्यकारी अभियंता, सासवड विभाग.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना क्र.२

ई निविदा सूचना क्र. ८६/२०२५-२०२६ (मुंबई) करीता

दिनांक १६/०३/२०२६ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई,दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा उपलब्धता, कंत्राटदारांचे प्रश्न, कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजित रक्कम
१.	तळोजा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती... पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यानंतर नाले व रस्त्याच्या कडील गटारांची साफसफाई तसेच इंजिनिअरिंग झोनमधील बांधकाम केलेल्या गटारांची यांत्रिक पद्धतीने साफसफाई व अनुषंगिक कामे करणे.	₹ २,३१,१८,२४२.००
२.	रोहा औद्योगिक क्षेत्रातील सामायिक सांडपाणी केंद्रा मधील वापरात नसलेल्या सिमेंट कॉंक्रीटच्या यु ए एसबी टाकीची दुरुस्ती व मजबुतीकरण करून सांडपाणी साठविण्याकरिता उपयोगात आणणे तसेच कंपाऊंड भिंतीचे बांधकाम करणे.	₹ ३,६२,४५,०१०.००

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र ०७/०४/२०२६ ते २१/०४/२०२६पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १०/०४/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलासा दिनांक १५/०४/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

PUBLIC NOTICE

Sealed tenders are hereby invited for the appointment of a Project Management Consultant (PMC) for Mahavir Nidhi Co-operative Housing Society Limited, located at Survey No. 199, Plot No. 13, Vishal Nagar, Ambadi Road, Vasai Road (West), Dist. Palghar - 401202, within the jurisdiction of Vasai-Virar City Municipal Corporation.

The plot area of the society is **630.00 square meters** as per the 7/12 extract.

Interested and eligible consultants are requested to submit their sealed tenders Along with a cheque of Rs 20,000/- [Rupees Twenty Thousand Only] NON REFUNDABLE. giving details of their PROFILE & EXPERIENCE to the society office within **10 days from the date of publication of this notice.**

The society reserves the right to reject any or all tenders without explanation.

Society Address:
Mahavir Nidhi CHS Ltd. Vishal Nagar, Ambadi Road, Vasai Road (West), Dist. Palghar - 401202.
Contact Number:
Chairman: 9869239936,
Secretary: 9975527171

For Mahavir Nidhi CHSL
Sd/-
Chairman / Secretary / Treasurer

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेल्या "दि ॲड्रेस" संकुलामधील "बुलेवर्ड-IV" या इमारतीच्या २२ व्या मजल्यावरील सदनिका क्र. २२०२, मोजमाप ८५४ चौ.फू. (कार्पेट) (यापश्चात **"सदर मालमत्ता"**), जी आमच्या अशिलांद्वारे खरेदी प्रक्रियेमध्ये आहे, करिता **सौ. डिंपल मनिष झवेरी (झवेरी)** यांच्या शीर्षकाची तपासणी करीत आहोत.

कोणा व्यक्ती/व्यक्तींचा सदर मालमत्तेमध्ये विक्री, हस्तांतरण, देवाणघेवाण, अभिहस्तांकन, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, करारपत्र, वारसा, दावा, ताबा, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, परवाना, धारणाधिकार, हिस्सा, भाडेकरू, उप-भाडेकरू, देखभाल, ताबा, योजना, मृत्युपत्र, कायद्याच्या प्रचलनाद्वारे बोजा या मार्गे किंवा अन्य कशाही प्रकारे कोणत्याही इतर पद्धतीने कोणताही दावा किंवा अन्य कोणताही हितसंबंध असल्यास त्यांना त्याबाबत कागदोपत्री पुराव्यांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह याद्वारे लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना त्यांच्या ७०७, वूहविंड सीएचएसएल, ७वा मजला, चकाला वजन काटा, कार्डिनल गेशियस रोड, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९९ येथील कार्यालयात सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत सूचित करण्याबाबत विनंती करण्यात येत आहे, असे न केल्यास असे मानण्यात येईल की, सदर **सौ. डिंपल मनिष झवेरी (झवेरी)** या सदर मालमत्तेच्या संपूर्ण मालक आहेत आणि सदर मालमत्ता सर्व बोजांपासून मुक्त आहे आणि शीर्षकाच्या तपासणीचे प्रकरण अशा दाव्याच्या, जर असल्यास, कोणत्याही संदर्भाशिवाय पूर्ण करण्यात येईल आणि ते सोडून दिले असे समजण्यात येईल आणि/किंवा असे कोणतेही कथित दावे, जर नंतर करण्यात आल्यास, आमच्या अशिलांवर बंधनकारक नसतील आणि सोडून दिले असे समजण्यात येतील आणि सदर संस्थेमध्ये अशा कोणत्याही कथित दावा किंवा हितसंबंधाच्या कोणत्याही माहिती किंवा संदर्भाशिवाय प्रस्तावित व्यवहार पूर्ण करण्यात येईल.

वरील उल्लेखित अनुसूची

सर्व मालमत्ता खालीलप्रमाणे-

(i) गाव विक्रोळी, तालुका कुर्लाचा सी.टी.एस. क्र. ५०, ५०/१ ते ७ आणि ५०/३५ ते ४४ धारण केलेल्या, मुंबईच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप जिल्ह्यामधील, आर. सिटी मॉलसमोर, एल.बी. एस. मार्ग, घाटकोपर (प) येथे स्थित वसलेल्या आणि असलेल्या बुलेवर्ड ३ ॲण्ड ४ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.च्या "बुलेवर्ड-IV" या इमारतीमधील "दि ॲड्रेस" या प्रकल्पामधील २२ व्या मजल्यावरील सदनिका क्र. २२०२, मोजमाप ८५४ चौ.फू. (कार्पेट) ही जागा.

(ii) बुलेवर्ड ३ ॲण्ड ४ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.मधील सदनिका क्र. २२०२ करिता भाग प्रमाणपत्र क्र. ७८४ मध्ये समाविष्ट डिस्टिंक्टिव्ह क्र. ३८३० ते ३८३९ (दोन्ही समाविष्ट) धारण केलेल्या रु. ५०/- प्रत्येकीचे १० पूर्णतः भरणा केलेले समभाग.

(iii) "दि ॲड्रेस" संकुलाच्या बी४ विंगमधील पोडियम लेव्हल-पी१ येथील एक कार पार्किंग जागा क्र. बी१३८.

दिनांक ७ एप्रिल, २०२६

इच्छुक खरेदीदारांकरिता ॲडव्होकेट धर्मिष्ठा भंदवा

७०७, वूहविंड सीएचएसएल, ७वा मजला, कार्डिनल गेशियस रोड, चकाला वजन काटा, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९९.

नवाकाळ

• मुंबई । मंगळवार ७ एप्रिल, २०२६ • पान -८

होर्मुजमध्ये ट्रम्प यांची मान अडकली

तेहरान - इराणवर विजय मिळवल्याचा, इराण पूर्णपणे नेस्तनाबूत केल्याचे दावे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सतत करीत असले तरी चित्र मात्र वेगळेच आहे. इराण ट्रम्प यांच्या नाकावर टिच्चून अमेरिकेच्या हल्ल्यांना तोडीस तोड प्रत्युत्तर देत आहे. आता तर इराणने एक व्यंगचित्र प्रसारित करून ट्रम्प यांची खिल्ली उडवली आहे. बल्गेरियातील इराणच्या दूतावासाने हे व्यंगचित्र समाजमाध्यमांवर प्रसारित केले आहे. त्यात ट्रम्प यांची मान होर्मुजमध्ये अडकली आहे, त्यांच्या चेहऱ्यावर वेदना दिसत आहे आणि मला श्वास घेता येत नाही, असे ते ओरडत असल्याचे दाखवले आहे. इस्त्रायल आणि अमेरिकेने युध्द लादल्यापासून इराणने होर्मुजची सामुद्रधुनी रोखून धरली आहे.

इस्त्रायली प्रवक्ते

टीव्ही चॅनेलवर दिसणाऱ्या सर्व इस्त्रायली प्रवक्त्यांमध्ये, दोन गोष्टी प्रकर्षाने जाणवतात:

१) प्रत्येकाचा उच्चार आणि बोलण्याची पद्धत वेगळी आहे. काही जण पोलिश, काही स्पॅनिश, काही फ्रेंच, काही पोर्तुगीज बोलतात, पण त्यांच्यापैकी कोणीही त्या प्रदेशाच्या उच्चारात बोलत नाही जिथे या लोकांनी बेकायदेशीरपणे आपले बस्तान बसवले आहे.

२) टीव्हीवर दिसणारे हे सर्व इस्त्रायली प्रवक्ते गोरे आहेत, किंवा अधिक अचूकपणे सांगायचे तर, पश्चिम युरोपातील गोरे आहेत. जगभरातील वृत्तवाहिन्यांवर त्यांच्या अमानुष गुन्ह्यांचे समर्थन करण्यासाठी किंवा निर्लज्जपणे ते नाकारण्यासाठी जे प्रवक्ते पाठवले जातात, त्यांच्यापैकी एकाही व्यक्तीमध्ये गोऱ्या किंवा काळ्या त्वचेचा, आशियाई किंवा आफ्रिकन वंशाचा किंचितही अंश आढळत नाही.

इस्त्रायल हा युरोपच्या आशियातील अवैध वसाहतवादी आक्रमणाचा शेवटचा अवशेष आहे. विचित्र आहे, नाही का? भौगोलिकदृष्ट्या युरोपमध्ये नसतानाही, तो युरोपियन युनियनचा एक सदस्य आहे. आशियामध्ये स्थित असून, तो युरो कपसह विविध खेळांमधील युरोपियन स्पर्धा आणि लीगमध्ये भाग घेतो. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, तो आशियातील युरोप आहे. २० व्या शतकात आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील (भारतासहित) लोकांनी साम्राज्यवादी आक्रमकांना आणि त्यांच्या

वसाहतींना हाकलून लावले आणि गुलामगिरीची जुनी, अमानुष वसाहतवादी व्यवस्था नष्ट करून जागतिक स्तरावर

अभिषेक देशपांडे

स्वतंत्र, स्वयंघोषित राष्ट्रांच्या एका नव्या युगाची स्थापना केली. इस्त्रायल हा त्याच अमानुष वसाहतवादी सत्तेचा शेवटचा उरलेला बालेकिल्ला आहे. परंतु साम्राज्यवादी शक्तींच्या दृष्टिकोनातून तो एक अत्यंत महत्त्वपूर्ण बालेकिल्ला आहे. सर्व माजी वसाहतवादी शक्तींप्रमाणेच, त्याचे स्वरूप उघडपणे वंशवादी आणि लोकशाहीला तीव्र विरोध करणारे आहे.

हा ज्यू विरुद्ध मुस्लीम किंवा इस्त्रायल विरुद्ध अरब यांच्यातील लढा नाही. हा राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि वसाहतवादी गुलामगिरी यांच्यातील लढा आहे. आणि म्हणूनच, ज्या प्रत्येक देशाने वसाहतवादी गुलामगिरीचा सर्वाधिक फटका सोसला आहे, तेथील लोकांची स्वाभाविक भूमिका, सैद्धांतिक आणि व्यावहारिक दोन्ही दृष्ट्या, पॅलेस्टिनी लोकांच्या बाजूने आणि इस्त्रायली राजवटीच्या विरोधात असायला हवी.

शेवटी, एक रंजक गोष्ट : त्यांचे पंतप्रधान देखील जन्माने बेंजामिन नेतान्याहू नव्हते. तो मूळचा पोलिश आहे, फिलाडेल्फियामध्ये वाढला आणि त्याचे मूळ नाव 'मिएलिकोव्स्की' होते.

■■■

माजी टेनिसपटू पेसला एक्स दर्जाची सुरक्षा

■ कोलकाता

माजी टेनिसपटू लिएंडर पेस याने काही दिवसांपूर्वी तृणमूल काँग्रेस सोडून भाजपामध्ये प्रवेश करताच त्याला केंद्रीय गृह मंत्रालयाकडून 'एक्स' दर्जाची सुरक्षा देण्यात आली आहे. त्याच्या संरक्षणासाठी सीआयएसएफचे जवान तैनात करण्यात आले आहेत. दिल्लीत पेस यांनी भारतीय जनता पक्षात औपचारिकपणे प्रवेश केल्यानंतर आठवडाभरातच हे पाऊल उचलण्यात आले आहे. पेसला कोणाकडून धमकी देण्यात आली होती का, याबद्दल काही माहिती नाही. भाजपात प्रवेश करताच लगेच पेसला 'एक्स' सुरक्षा देण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

दिंडोशी मारहाणनंतर बुलडोझर कारवाई आरोपींची घरे पाडली! १० जणांना अटक

■ मुंबई

गोरेगाव पूर्व येथील संतोष नगर आणि दिंडोशी परिसरात दोन गटांमध्ये झालेल्या तुफान हाणामारीमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. काल रात्री मरियम माता शोभायात्रेदरम्यान झटापट झाली. यावेळी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना लाठीमार करावा लागला. या प्रकरणी दिंडोशी पोलिसांनी तत्काळ कारवाई करत १० जणांना अटक केली. तर आज आरोपींच्या बेकायदेशीर बांधकामांवर बुलडोझर चालवला.

संतोष नगर मार्केट परिसरातील ज्योती बार अँड रेस्टॉरंटजवळ दोन गट आमनेसामने आले आणि त्यांच्यात जोरदार हाणामारी झाली. या घटनेत बजरंग दलचे तीन

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

कार्यकर्ते गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. जखमींवर हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. जमावाला पांगवण्याचा प्रयत्न करताना परिस्थिती बिघडल्याने हलका लाठीमार करण्यात आला. त्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली असून, परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे इतर आरोपींचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, या घटनेनंतर आज सकाळी मुंबई महानगरपालिकेकडून मोठी कारवाई करण्यात आली.

अंजली दमानियांनी भोंदू अशोक खरातच्या सीडीआर प्रकरणी होणारे आरोप फेटाळले

■ मुंबई

भोंदूबाबा अशोक खरातचे सीडीआर सार्वजनिक केल्यानंतर वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी होणारे आरोप फेटाळले. याप्रकरणी त्यांनी आज पत्रकार परिषद घेऊन उबाठा उपनेत्या सुषमा अंधारे यांच्यासह आरोप करणाऱ्या नेत्यांवर हल्लाबोल केला. त्यानंतर सायंकाळी त्यांनी महाराष्ट्र पोलीस महानिरीक्षक सदानंद दाते यांची भेट घेऊन त्यांना सर्व माहिती दिल्याचे सांगितले.

अंजली दमानिया म्हणाल्या की, मागच्या चार ते पाच दिवसांपासून वेगवेगळ्या लोकांकडून प्रतिक्रिया येत आहेत. विषय काय? मी मांडले काय? लोक काय बोलत आहेत. संजय राऊत म्हणाले की मी रॉ ची एजंट आहे का?

सुषमा अंधारे तर कायमच माझ्यावर टीका करत आहेत. मला भाजपाच माहिती देते आहे वगैरे सर्व सांगतात. अहो सुषमाताई साध क्लॉड नावाचं ॲप आहे. त्यात सगळ्या गोष्टी मिळतात. ३१ मार्चच्या दुपारी १२ च्या सुमारास मला एका व्यक्तीचा मेसेज आला त्याने माझ्याकडे अशोक खरातांची माहिती आहे, मला ती तुम्हाला द्यायची आहे असे सांगितले. त्या माणसाने त्याची ओळख खासगी गुप्तहेर अशी करून दिली. त्या व्यक्तीने मला त्याचे नाव त्याच्या कंपनीचे नावही सांगितले. नंतर त्याने दुसऱ्या फोन नंबरवरून एक्सएल शिट पाठवले. त्यात अनेक तपशील होते. ज्या नेत्यांचे नंबर मिळाले नाहीत त्यांच्या नावापुढे क्रॉस केले आणि ज्यांचे नंबर मिळाले त्यांची नावे सार्वजनिक केले. लगेच माझ्यावर आरोप झाले. यामध्ये भाजपाचे नाव नाही वगैरे विचारले. आम्ही फालतू राजकारण नाही. मिलिंद नार्वेकरांचे

पान ७ वर

तेलवाहू जहाजावर खलाशाचा मृत्यू मृतदेहाची डीएनए चाचणीची मागणी

उपमहासंचालकांना बाजू मांडण्याचे आदेश

■ मुंबई

ओमानच्या किनाऱ्याजवळ तेलवाहू जहाजावरील ड्रोन हल्ल्यात मृत्यू झालेल्या खलाशाच्या मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी डीएनए चाचणी झाल्यानंतरच मृतदेह ताब्यात घेतला जाईल, अशी भूमिका याचिकाकर्त्या वडिलांनी हायकोर्टात घेतली. याची दखल घेत हायकोर्टाने शिपिंग विभागाच्या उपमहासंचालकांना उद्या उत्तर देण्याचे आदेश दिले.

युद्धावेळी ४ मार्चला स्फोटकांनी भरलेला ड्रोन ओमान येथील एमटी एमकेडी व्योम या तेलवाहू जहाजावर पडला. त्यात बोटीवर खलाशी असलेले २५ वर्षीय दीक्षित सोलंकी ठार झाले. महिना उलटूनही पार्थिव ताब्यात न मिळाल्याने दीक्षितचे वडील अमृतलाल व बहीण मिताली यांनी वकील सतिश तळेकर व ॲड. माधवी अय्यपन यांच्यामार्फत याचिका दाखल केली होती. मृत झालेल्या कुटुंबातील सदस्यावर सन्मानाने अंत्यसंस्कार करणे हा मूलभूत अधिकार आहे. मात्र प्रशासकीय दिरंगाईमुळे या प्रक्रियेत विलंब होत असल्याने मृतदेह अद्याप ताब्यात मिळालेला नाही त्यामुळे न्यायालयाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी विनंती कुटुंबियांनी केली.

नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

महाराष्ट्र शासन

एम एम आर डी ए
MMRDA

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

उद्घाटन समारंभ

मेट्रो मार्गिका - ९ आणि २ब (पहिला टप्पा),
टी बी एम द्वारे ठाणे - बोरिवली दुहेरी बोगदा मार्गाच्या कामाचा शुभारंभ
व पॉड टॅक्सीचा ई - भूमिपूजन सोहळा

यांच्या शुभहस्ते
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

प्रमुख उपस्थिती
एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री
सुनेत्रा अजित पवार
उपमुख्यमंत्री

» मेट्रो लाईन ९, टप्पा-१
४.७ किमी: दहिसर पूर्व ते काशीगाव
स्थानके: दहिसर पूर्व, पांडुरंगवाडी, मिरागाव, काशीगाव
→ अंधेरी–मीरा रोड थेट जोडणी
→ ठाणे जिल्ह्यातील पहिली मेट्रो
→ डबल डेकर - मेट्रो + उड्डाणपूल
→ मेट्रो लाईन २अ सोबत इंटरचेंज
→ भविष्यात विमानतळाशी जोडणी
→ शून्य कार्बन उत्सर्जन प्रवास

» मेट्रो लाईन २ब, टप्पा-१
५.५३ किमी: चेंबूर ते मंडाळे
स्थानके: देशभक्त एन. जी. आचार्य उद्यान – डायमंड गार्डन, छत्रपती शिवाजी महाराज चौक, देवनार, मानखुर्द, महाराष्ट्र नगर – मंडाळे
→ मेट्रो लाईन २अ चा विस्तार
→ मंडाळे डेपो : आशियातील सर्वात मोठे मेट्रो डेपो
→ सर्व स्थानकांना इंडियन ग्रीन बिल्डींग कौन्सिलचे प्लॅटिनम
→ शून्य कार्बन उत्सर्जन प्रवास मीनांकन

» पॉड टॅक्सी (वांद्रे–कुर्ला)
८.८५ किमी उन्नत मार्गिका
→ २२ स्थानके
→ पहिल्या टप्प्यात ३.३६ किमीमध्ये ८ स्थानके
→ चालकरहित, वातानुकूलित, पॉड प्रणाली
→ क्षमता : प्रत्येक पॉडमध्ये ६ प्रवासी
→ सार्वजनिक - खाजगी तत्वावर उभारणी
→ शून्य कार्बन उत्सर्जन प्रवास

» टीबीएम लाँचिंग – ठाणे – बोरिवली दुहेरी बोगदे
एकूण ११. ८४ किमीचा प्रकल्प
→ १३.३ मीटर व्यासाच्या टीबीएमद्वारे १०.२५ किमी दुहेरी बोगद्याची निर्मिती
→ प्रवास वेळ : १५ मिनिटे
→ ७५ मिनिटांची बचत
→ जलद पूर्व – पश्चिम जोडणी
→ जगातील सर्वात खोल शहरी बोगदा

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री
सुनेत्रा अजित पवार
उपमुख्यमंत्री
माधुरी मिसाळ
राज्यमंत्री

स्थळ व वेळ

दिनांक : ७ एप्रिल, २०२६		
	ठिकाण : दहिसर मेट्रो स्थानक	वेळ : सकाळी ११:०५ वाजता.
	ठिकाण : मानपाडा, ठाणे	वेळ : दुपारी १२:१५ वाजता.
	ठिकाण : डायमंड गार्डन मेट्रो स्थानक	वेळ : दुपारी १:१५ वाजता.

आपले विनीत
डॉ. संजय मुखर्जी (भा.प्र.से.)
महानगर आयुक्त । मुं.म.प्र.वि.प्रा.

Live on: MMRDA Official | Mumbai Metropolitan Region Development Authority- MMRDA | @MMRDAOfficial